# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

June 2024 - July 2024 / Issue No. 02 | Price : Rs. 30/-



# *Newly Elected Office Bearers*

## *2024-2026*



**Lalit Gandhi**
President



**Ravindra Mangave**
Senior
Vice President



**Karunakar hetty**
Vice President -
Mumbai-1



**Shankar Shinde**
Vice President
Mumbai-2



**Sanjay Sonwane**
Vice President
North Maharashtra - 1



**Sangita Patil**
Vice President
North Maharashtra - 2



**Ramakant Malu**
Vice President
Western Mah. - 1



**Dilip Gupta**
Vice President
Western Mah. - 2



**Praful Malani**
Vice President
Marathwada



**Shrikrishna Parab**
Vice President
Konkan



**Vijay Vedmutha**
Permanant
Invitee



**Kantilal Chopda**
Permanant
Invitee



**Ashish Pednekar**
Chairman Trust Board



**Prakash Awade**
Trustee



**Sanjay Ghodawat**
Trustee



**Ghanshyam Goyal**
Trustee



**Vishwajeet Dahanukar**
Trustee



**Mahendra Agarwal**
Trustee

MACCIA 100
Apex Chamber of the State 1927-2027
MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE

# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

June 2024 - July 2024/ Issue No. 2

**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चर**

ओरिकॉन हाऊस, ६ वा मजला, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स मार्ग, काळा घोडा, फोर्ट, मुंबई- ४००००१
फोन : (०२२) २२८५५८५९/६०
ई-मेलः maccia@maccia.org.in
वेबसाईट : www.maccia.org.in

**संपादकीय समिती**

- अध्यक्ष व संपादक
  **ललित गांधी**
- वरिष्ठ उपाध्यक्ष
  **रविंद्र माणगावे**
- उपाध्यक्ष
  **करूणाकर शेट्टी**
  **संजय सोनवणे**
  **रमाकांत मालु**
  **प्रफुल मालाणी**
  **शंकर शिंदे**
  **संगीता पाटील**
  **दिलीप गुप्ता**
  **श्रीकृष्ण परब**
- सरकार्यवाह
  **सुरेश घोरपडे**
- सहसंपादक
  **अविनाश पाठक**

- **उत्तर महाराष्ट्र शाखा कार्यालय**
  ४९, पाचवा मजला, बिजनेस बे, श्रीहरी कुटे मार्ग, मुंबई नाका, नाशिक - ४२२००१
  फोनः (०२५३)२५७७७०४
  ई-मेलः nsk@maccia.org.in
- **रत्नागिरी जिल्हा कार्यालय**
  जावकर प्लाझा, जयस्तंभ, रत्नागिरी.
- **जळगाव जिल्हा कार्यालय**
  २१-ए, राम स्टेट बँक कॉलनी, रिंगरोड, जळगाव - ४२५००१
- **पूणे जिल्हा कार्यालय**
  प्लॉट नं. ईएल-१५, एमआयडीसी, भोसरी, पूणे - ४११०२६.

**कार्यालय** : अंधेरी (मुंबई), नवी मुंबई, ठाणे, पालघर, धुळे, जळगांव, बारामती, रत्नागिरी, पलुस (सांगली)

**Note :** Articles published in this bulletin do not necessarily reflect the views of the Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture.

# अंतरंग

१. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स व केंद्र शासन संयुक्तरित्या राज्यभर राबविणार कौशल्य विकास अभियान - अतुलकुमार तिवारी
२. नवीन कार्यकारीणीची दुसरी बैठक ऐतिहासिक व विविध विक्रमांची नोंद घेणारी ठरली
३. ईगतपूरीमध्ये बाहेर धो-धो पाऊस बरसत असताना, 'फर्न' च्या सभागृहात नवीन चीफ पेट्रन, पेट्रन व सेंटेनरी सभासदांची अक्षरशः बरसात
४. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना
५. विकासपूरक सर्वसमावेशक बजेट
६. नंदुरबार जिल्ह्यात ॲग्रो क्लस्टर व बांबू क्लस्टरला चालना देण्यासाठी प्रयत्न - ललित गांधी
७. अमळनेर मध्ये नवीन एमआयडीसीच्या जागेसाठी शासनाकडे पाठपुरावा करू - अध्यक्ष ललित गांधी
८. धुळे येथे व्यापारी उद्योजक परिषद संपन्न
९. सोलापूर आर्यनंदी एज्युकेशन अँड रिसर्च फाउंडेशनच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ
१०. जीएसटी आयटीसी मागण्यासाठी रिटर्न व्यतिरिक्त काही वेगळा पर्याय आहे का?




# संपादकीय..

ललित गांधी
अध्यक्ष

''विकसित भारत – २०४७'' या संकल्पनेच्या दिशेने टाकलेले महत्वाचे पाऊल म्हणजे 'अर्थसंकल्प–२०२४'.

अर्थव्यवस्थेतील सर्व घटकांच्या विकासासाठी सरकारने सकारात्मक भुमिका घेतली आहे.

कौशल्य विकासाला दिलेले प्राधान्य, युवकांना रोजगार व उद्यमशिलतेसाठी विशेष अभियान, शेतीच्या विकासासाठी दिलेले विशेष महत्व व अन्य सर्वच विभागातील तरतूदी या निश्चितच उद्योग विकासाला चालणा देणाऱ्या आहेत.

महाराष्ट्र सरकारने ही अर्थसंकल्पाच्या माध्यमातुन जाहीर केलेल्या विविध योजनांपैकी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' ही योजना अत्यंत महत्वाची व दुरगामी फायद्याची ठरणार आहे.

बेरोजगारी च्या समस्येला सामोरे जाणाऱ्या युवा वर्गाला रोजगार व उद्यमशीलतेसाठी ही योजना उपयोगाची ठरणार आहे.

राज्य सरकार व केंद्र सरकारच्या या योजना महाराष्ट्रात प्रभावीपणे राबविण्यासाठी महाराष्ट्र चेंबर व्यापक अभियान हाती घेत आहे.

महाराष्ट्र चेंबरच्या शतकमहोत्सवी वर्षानिमित्त चेंबर राबवित असलेल्या विविध प्रकल्प विषयांच्या राष्ट्रीय परिषदा व सम्मेलने आयोजित करण्याचा निर्णय घेतला असुन कौशल्य विकास–उद्यमशीलता व पर्यटन या विषयावरच्या परिषदा लवकरच आयोजित करण्यात येत आहेत.

कौशल्य विकास राष्ट्रीय परिषदेपूर्वी भारत सरकार व राज्य सरकारच्या योजनांची माहीती द्यावी व उद्योग, व्यापार जगताच्या अपेक्षा समजुन घेण्यासाठी भारत सरकारच्या कौशल्य विकास मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. २६ जुलै रोजी 'नाशिक' येथे उद्योजक संवाद बैठक संपन्न झाली.

भारत सरकारच्या कौशल्य मंत्रालयाचे सचिव अतुलकुमार तिवारी (IAS), नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम (IAS), महाराष्ट्र सरकारच्या कौशल्य विकास मंत्रालयाच्या आयुक्त निधि चौधरी (IAS) या महत्वपूर्ण अधिकाऱ्यांनी पुर्ण वेळ उपस्थित राहून महाराष्ट्र चेंबरच्या उपक्रमास भक्कम पाठबळ देण्याचे अभिवचन दिले ही बाब महाराष्ट्र चेंबरच्या कौशल्य विकासाच्या अभियानास प्रोत्साहन देणारी ठरेल.

ईगतपूरी (जि. नाशिक) च्या निसर्गरम्य वातावरणात धो–धो कोसळणाऱ्या पाऊसाच्या साक्षीने ज्या पध्दतीने चीफ पेट्रन (५ लाख) व पेट्रन (१ लाख २० हजार) सभासदत्वांची बरसात झाली ते दृश्य अविस्मरणीय आहे.

राज्याच्या सर्व विभागीय उपाध्यक्षांनी त्या – त्या विभागातील गव्हर्निंग काऊन्सील सदस्यांच्या समवेत पॅनेल डिस्कशन संपादीत करून प्रत्येक विभागाच्या अपेक्षा व समस्या मांडून राज्याच्या विकासाचा एकप्रकारे रोडमॅपच तयार केला आहे. या रोडमॅपमधील विषयांचा चेंबरद्वारे पाठपूरावा करून सर्व विषय मार्गी लावण्याचा प्रयत्न करू.

पदाधिकारी, गव्हर्निंग काऊन्सील सदस्य व तज्ञ समित्यांचे पदाधिकारी यांची अपार ऊर्जा व उत्साह व चेंबरच्या कामकाजातील सहभागाची इच्छाशक्ती मला प्रेरणादायी आहे. या सर्वांच्या सोबतीने शतकमहोत्सवी कालखंडातील ही कार्यकारीणी महाराष्ट्र चेंबरच्या इतिहासातील गौरवपूर्ण कार्य संपादीत करेल.

२३–२४ च्या आर्थिक वर्षात चेंबरने मिळविलेले १ कोटी ५१ लाखाचे उत्पन्न आतापर्यंतच्या इतिहासातील विक्रमी उत्पन्न आहे. पुढील अनेक विक्रमांची ही नांदी ठरो ही परमेश्वरचरणी प्रार्थना..!




**बैठकीत मार्गदर्शन करताना केंद्र सरकारच्या कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाचे सचिव अतुलकुमार तिवारी. व्यासपीठावर राज्याच्या कौशल्य विकास विभागाच्या आयुक्त श्रीमती निधी चौधरी, नाशिक महसूल विभाग आयुक्त डॉ. प्रविण गेडाम, अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र माणगावे, उपाध्यक्ष संजय सोनवणे, सौ. संगीता पाटील, करुणाकर शेट्टी, प्रफुल्ल मालाणी, ट्रस्टी आशिष पेडणेकर, जितेंद्र ठक्कर, कृणाल पाटील, प्रमोद खैरनार.**

# महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स व केंद्र शासन संयुक्तरित्या राज्यभर राबविणार कौशल्य विकास अभियान - अतुलकुमार तिवारी

देशाच्या व राज्याच्या विकासासाठी कौशल्य विकास महत्वाचा आहे. कौशल्य विकास शहरासह ग्रामीण स्तरांवरही होणे आवश्यक आहे. केंद्र व राज्य सरकारच्या कौशल्य विकासाच्या अनेक योजना असून सर्वसाधारण शिक्षण व कौशल्य यांना समकक्ष असणे महत्वाचे आहे. त्यामुळे श्रमालाही महत्व असते हे जाणवेल. यादृष्टीने कौशल्य विकासाच्या योजना असून नव्या शैक्षणिक धोरणातही त्याला स्थान आहे. महाराष्ट्र चेंबरने पुढाकार घेऊन हे कार्य हाती घेतल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून महाराष्ट्रात कौशल्य विकास केंद्रे सुरु करण्यासाठी महाराष्ट्र चेंबरला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन ही केंद्रिय कौशल्य विकास व उद्योजकता सचिव अतुलकुमार तिवारी यांनी दिले.

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' ने विकासोन्मुख कार्य गेल्या नऊ दशकात केले आहे आणि त्याअनुषंगाने चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी जे कार्य हाती घेतले आहे त्याबद्दल कौतुक करून केंद्र शासन व महाराष्ट्र चेंबर संयुक्तपणे महाराष्ट्रात कौशल्य विकास अभियान राबविणार आहे असे सांगितले. सुरवातीला उपस्थितांचे स्वागत करून महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची ऐतिहासिक ओळख करून दिली. अलीकडच्या काळात राज्यातील उद्योगांना कुशल







**केंद्र सरकारच्या कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाचे सचिव अतुलकुमार तिवारी यांचा सत्कार करताना अध्यक्ष ललित गांधी दुसऱ्या छायाचित्रात महाराष्ट्र राज्याच्या कौशल्य विकास विभागाच्या आयुक्त श्रीमती निधी चौधरी यांचा सत्कार करताना संगीता पाटील तीसऱ्या छायाचित्रात नाशिक महसूल विभाग आयुक्त डॉ. प्रविण गेडाम यांचा सत्कार करताना आशिष पेडणेकर.**



**कौशल्य विकास आणि उद्योजक समन्वय बैठकीत मार्गदर्शन करतांना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी.**

मनुष्यबळ व तरुणांना शिक्षण आधारित रोजगार मिळावण्यासाठी बिझनेस सोल्युशन पॉलीक्लिनिक या उपक्रमांतर्गत १८ हजार विद्यार्थ्यांना उद्योगात प्रशिक्षित करून रोजगार उपलब्ध करून दिल्याचे सांगितले. केंद्र व राज्य सरकारच्या कौशल्य विकास विभागाच्या मार्गदर्शन व सहकार्याने नाशिकसह राज्यात कौशल्य विकास केंद्रे सुरु केली जातील अशी माहिती दिली.

**राज्याचे कौशल्य विकास प्रयत्न :** याप्रसंगी महाराष्ट्र राज्याच्या कौशल्य विकास आयुक्त श्रीमती निधी चौधरी यांनी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना यासंदर्भात माहिती दिली. त्याचप्रमाणे आयटीआय केंद्रांमध्ये केल्या जाणाऱ्या सुधारणांमुळे आवश्यक असे कौशल्य तरुण तरुणींना मिळू शकेल असे सांगितले. उद्योजकांनी आणि चेंबरसारख्या औद्योगिक संस्थांनी कौशल्य विकास योजनांमध्ये भागीदार होऊन सहकार्य करावे असे आवाहन केले.

नाशिक विभाग महसूल आयुक्त डॉ. प्रविण गेडाम यांनी शिक्षण व कौशल्य विकास यामध्ये जो फरक आहे तो भरून निघणे आवश्यक आहे असे सांगून सर्वांनी एकत्र येऊन काम





**स्वामी कंठानंद यांचा सत्कार करताना अध्यक्ष ललित गांधी दुसऱ्या छायाचित्रात क्रेडाई महाराष्ट्रचे अध्यक्ष प्रमोद खैरनार यांचा सत्कार करताना उपाध्यक्ष संजय सोनवणे व प्रफुल मालाणी**



**केंद्र सरकारच्या कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाचे सचिव अतुलकुमार तिवारी यांच्याशी चर्चा करताना ललित गांधी**

करावे असे सुचविले. नाशिकमध्ये कौशल्य विकासासाठी पोषक वातावरण असून नाशिक येथील कार्य आणि केंद्र हे पथदर्शी म्हणून करूयात असे आवाहन केले. त्यापासून बोध घेऊन संपूर्ण देशात असे कार्य त्यातून उभे राहील असेही ते म्हणाले.

स्किल सिटी नाशिकचे समन्वयक जितूभाई ठक्कर यांनी स्किल सिटी नाशिकची माहिती दिली. तसे यादृष्टीने कौशल्य विकासासाठी सुरु असलेल्या उपक्रमांची माहिती देऊन सर्वांनीत्यात सहभागी व्हावे असे आवाहन केले.

क्रेडाई महाराष्ट्रचे अध्यक्ष प्रमोद खैरनार यांनी बांधकाम व्यावसायिकांच्या अडचणी मांडल्या. तसेच क्रेडाईमार्फत कुशल मनुष्यबळ उभे करत असलेल्या संदर्भात राबविलेल्या उपक्रमांची उपक्रमांची माहिती दिली.

**समन्वय बैठक** – नवे शैक्षणिक धोरण आणि कौशल्य विकास संदर्भातील केंद्र सरकारचे धोरण या अनुषंगाने महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अँग्रीकल्चर या शिखर संस्थेच्या वतीने गेली काही वर्षे केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकार







**कौशल्य विकास आणि उद्योजक समन्वय बैठकीत मार्गदर्शन करतांना नाशिक महसूल विभागआयुक्त डॉ. प्रविण गेडाम, महाराष्ट्र राज्याच्या कौशल्य विकास विभागाच्या आयुक्त श्रीमती निधी चौधरी, स्किल सिटी नाशिकचे समन्वयक जितेंद्र ठक्कर.**

यांच्या मध्ये विचार विनिमय चालू होता. व्यापार उद्योग सेवा आणि इतरही क्षेत्रामध्ये कुशल मनुष्यबळ पुरवता यावे यादृष्टीने संबंधित संस्थांच्या सहकार्याने समन्वय बैठकाघेण्याबाबत ठरले होते. त्याची सुरवात नाशिक येथे अशा प्रकारच्या शासन आणि व्यापार, उद्योग, सेवा, कृषी व अन्य संस्था यांची महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर यांच्या पुढाकाराने झाली. यावेळी केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता सचिव अतुलकुमार तिवारी व महाराष्ट्र कौशल्य विकास आयुक्त श्रीमती निधी चौधरी, नाशिक महसूल आयुक्त डॉ. प्रविण गेडाम यांच्या उपस्थितीमध्ये झाली. हॉटेल एसएसके सॉलिटिअर येथे झालेल्या या बैठकीला केंद्र आणि राज्य सरकारातील मिळून २० वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते.

याप्रसंगी व्यासपीठावर समन्वय बैठकीचे व महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, केंद्रिय कौशल्य विकास आणि उद्योजकता सचिव अतुलकुमार तिवारी, महाराष्ट्र राज्याच्या कौशल्य विकास विभागाच्या आयुक्त निधी चौधरी, नाशिक विभागीय महसूल आयुक्त डॉ. प्रविण गेडाम आणि महाराष्ट्र चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र माणगावे, उपाध्यक्ष संजय सोनवणे, उपाध्यक्षा सौ. संगीता पाटील, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, उपाध्यक्ष प्रफुल्ल मालाणी, महाराष्ट्र चेंबर विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, स्किल सिटी नाशिकचे समन्वयक जितेंद्र ठक्कर, क्रेडाईचे मेट्रो सिटी नाशिकचे अध्यक्ष कृणाल पाटील, क्रेडाई महाराष्ट्रचे अध्यक्ष प्रमोद खैरनार उपस्थित होते. सुरवातीला क्रेडाई नाशिक मेट्रो सिटीचे अध्यक्ष कृणाल पाटील यांनी स्वागतकेले. सूत्रसंचालन स्किल सिटी नाशिकचे रामाशिष भुतडा यांनी केले. तसेच सिआयआयचे प्रतिनिधी सुधीर मुतालिक यांनी आपले मनोगत व्यक्त केल्यावर नाशिक सिटीझन फोरमचे आभार प्रदर्शन नाशिक सिटीजन फोरमचे उपाध्यक्ष आर्किटेक्चर डॉ. सचिन गुळवे यांनी मानले.

या समन्वय सभेला मुंबई, नवी मुंबई, ठाणे, जळगाव, धुळे, कोल्हापूर, पुणे, सांगली, नाशिक आदी भागातील महाराष्ट्र चेंबरचे कार्यकारिणी सदस्य आणि उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.







**कौशल्य विकास आणि उद्योजक समन्वय बैठकीत मार्गदर्शन करताना उपाध्यक्षा संगीता पाटील, दिपा राऊत, क्रेडाई महाराष्ट्रचे अध्यक्ष प्रमोद खैरनार, स्वामी कंठानंद.**





**ईगतपूरी (जि. नाशिक) येथे संपन्न दुसऱ्या गव्हर्निंग काऊन्सील बैठकीचे दिपप्रज्वलनाने उद्घाटन व संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करताना मॅनेजिंग कमिटीचे सर्व सदस्य.**

# नवीन कार्यकारीणीची दुसरी बैठक ऐतिहासिक व विविध विक्रमांची नोंद घेणारी ठरली

**ईगतपूरी (जि. नाशिक)** : महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रीकल्चर या व्यापार व उद्योजकांच्या शिखर संस्थेची नवनिर्वाचित पदाधिकारी व गव्हर्निंग काऊन्सिल सदस्य तसेच तज्ञ समिती पदाधिकारी, चेअरमन, को-चेअरमन यांची बैठक विद्यमान अध्यक्ष ललित गांधी यांच्या अध्यक्षतेखाली इगतपूरी येथील दि फर्न रिसोर्ट येथे २५ जुलै रोजी उत्साहात पार पडली.

या बैठकीस राज्याच्या कानाकोपऱ्यातील गव्हर्निंग काऊन्सिल सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दोन दिवसांच्या या निवासी मिटींगमध्ये गव्हर्निंग काऊन्सिल सदस्य यांना त्यांचे अधिकार, जबाबदाऱ्या यांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच चेंबरच्या पदाधिकाऱ्यांचे राज्याच्या विभागाप्रमाणे असलेल्या उद्योग जगतातील समस्याबाबत पॅनेल डिस्कशन घेण्यात आले. या खुल्या चर्चेत सदस्यांनी आपल्या रिजनमधील उद्योगातील समस्या, रस्ते, विमान सेवा, जीएसटी, शासकीय निमय अटी इ. यांवर मनमोकळी चर्चा केली. सदस्य मिटींगमध्ये असे पॅनल डिस्कशन करून आपल्या समस्यांना महाराष्ट्र चेंबर वाचा फोडण्यास पुढाकार घेत असल्याने राज्यातील उत्तर महाराष्ट्र, कोकण, विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र इ. मुंबईतील सदस्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच व्यापार, उद्योग क्षेत्रातील या समस्या सोडवण्यासाठी चेंबरचे वरीष्ठ पातळीवर प्रयत्न करावे अशी मागणी केली.

या कार्यशाळेत चेंबरने विविध उपक्रमां अंतर्गत सुरू केलेल्या नेटवर्किंग, मार्केटींग, कौशल्य विकास, युवा उद्योजकता, स्टार्टअप, टिम बिल्डींग, तज्ञ समित्यांचे कार्य अशा विविध विषयांवर सदस्यांना तज्ञांनी मार्गदर्शन केले.

इगतपुरीच्या आल्हाददायक वातावरणात राज्यभरातील पदाधिकाऱ्यांनी दिवसभर बसून राज्याच्या विकासाचे चिंतन केले या मिटींगसाठी वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, ट्रस्ट बोर्डचे चेअरमन आशिष पेडणेकर, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, संजय सोनवणे, सौ. संगिता पाटील, रमाकांत मालु, दिलीप गुप्ता, प्रफल्ल मालाणी, श्रीकृष्ण परब, शंकर शिंदे, माजी अध्यक्ष संतोष मंडलेचा व राज्यभरातील नवनिर्वाचित पदाधिकारी उपस्थित होते.






**दुसऱ्या कार्यकारीणी सभेस संबोधन करताना अध्यक्ष ललित गांधी व समोर उपस्थित सर्व सदस्य.**

# ईगतपूरीमध्ये बाहेर धो-धो पाऊस बरसत असताना, 'फर्न' च्या सभागृहात नवीन चीफ पेट्रन, पेट्रन व सेंटेनरी सभासदांची अक्षरशः बरसात










नवीन चीफ पेट्रन सदस्य दिपक चौधरी, मनोज झंवर, ओमप्रकाश अगरवाल, विजय बेदमुथा, रमाकांत मालु, कैलास अग्रवाल यांचा सत्कार संपन्न. नवीन पेट्रन सदस्य जयेश गायके, मनोज चव्हाण, प्रमोद सांगोडे सम्मानित.




कैलास (महेंद्र) अगरवाल यांनी १ चीफ पेट्रन, ५ पेट्रन, ३५ सभासद यांचे अर्ज एकत्रितरीत्या सादर केले. ईगतपूरी च्या ऐतिहासिक सभेचे सुत्रसंचलन करताना दत्ता भालेराव व राजाराम सांगोळे.





बैठकीत स्वागत करताना उत्तम महाराष्ट्र (१) संजय सोनवणे, बैठकीस संबोधित करताना अध्यक्ष ललित गांधी व संपूर्ण व्यवस्थापन समिती पदाधिकारी.

# चेंबरच्या इतिहासात प्रथमच सर्व विभागीय उपाध्यक्ष व जीसी मेंबर यांचे पॅनेल डिस्कशन्स च्या माध्यमातुन राज्याच्या विकासाचा रोडमॅप सादर




उपाध्यक्ष (१) संजय सोनवणे, उपाध्यक्ष (२) संगीता पाटील व अन्य सदस्य




उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी व अन्य सदस्य




उपाध्यक्ष प्रफुल्ल मालाणी व अन्य सदस्य




उपाध्यक्ष श्रीकृष्ण परब व अन्य सदस्य




उपाध्यक्ष शंकर शेट्टी व अन्य सदस्य




उपाध्यक्ष दिलीप गुप्ता व अन्य सदस्य



अध्यक्ष ललित गांधी यांनी पूर्णवेळ सभागृहात बसून सर्व विभागाचे पॅनेल चे मुद्दे नोंद करून घेतले.




नवनियुक्त जीसी मेंबर व महाराष्ट्र सरकारच्या आर्थिक सल्लागार समितीचे सदस्य प्रसन्न देशपांडे





# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना

### मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना काय आहे ?

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना हा महाराष्ट्र सरकारचा एक उपक्रम आहे ज्याचा उद्देश राज्याच्या तरुणांमधील कौशल्याची दरी भरून काढणे आणि रोजगारक्षमता वाढवणे आहे. हे उद्योग भागीदारीद्वारे नोकरीवर प्रशिक्षण प्रदान करते, प्रशिक्षणार्थींना रु.१०,००० मासिक स्टायपेंड ऑफर करते. उद्योग सहकार्याला प्रोत्साहन देणे, रोजगारक्षमता वाढवणे आणि उद्योजकतेला संभाव्य प्रोत्साहन देणे हे उद्दिष्ट आहे. या योजनेत महाराष्ट्रातील तरुणांचे जीवन बदलण्याची आणि राज्याच्या आर्थिक वाढीस हातभार लावण्याची क्षमता आहे. त्याचे यश प्रभावी अंमलबजावणीवर अवलंबून आहे, ज्यात मजबूत प्रशिक्षण पायाभूत सुविधा, सुव्यवस्थित निवड प्रक्रिया, उद्योग संरेखन, कार्यप्रदर्शन निरीक्षण आणि जागरूकता प्रोत्साहन यांचा समावेश आहे.

### युवा कार्य शिक्षण योजनेची उद्दिष्टे

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना महाराष्ट्र, कौशल्यांमधील अंतर दूर करण्यासाठी आणि तरुण मनांना सक्षम करण्यासाठी डिझाइन केलेल्या बहु-आयामी दृष्टिकोनाचा अभिमान आहे:

**कौशल्य विकास प्रशिक्षण :** हा कार्यक्रम उद्योगांसह भागीदारीद्वारे नोकरीवर प्रशिक्षण देण्यावर भर देतो. हे अनुभवात्मक शिक्षण सहभागींना सध्याच्या जॉब मार्केटच्या मागणीशी संबंधित व्यावहारिक कौशल्यांसह सुसज्ज करेल.

**स्टायपेंड सपोर्ट :** योजनेचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे रु. प्रशिक्षणार्थींना १०,००० मासिक वेतन दिले जाते. या आर्थिक सहाय्याचा उद्देश आर्थिक भार कमी करणे आणि सहभागास प्रोत्साहन देणे, विशेषतः आर्थिकदृष्ट्या वंचित पार्श्वभूमीतील लोकांसाठी आहे.

**उद्योग सहकार्याला प्रोत्साहन देणे:** कार्यक्रम सरकार, शैक्षणिक संस्था आणि उद्योग यांच्यातील सहकार्यावर भर देतो. हे उद्योग-संरेखित प्रशिक्षण मॉड्यूल्सच्या विकासास प्रोत्साहन देते जे विशिष्ट कौशल्य आवश्यकता पूर्ण करतात.

**रोजगारक्षमता वाढवणे:** विद्यार्थ्यांना उद्योग-संबंधित कौशल्ये आणि व्यावहारिक अनुभवाने सुसज्ज करून, प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या रोजगारक्षमतेत लक्षणीय वाढ करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

**उद्योजकतेला प्रोत्साहन देणे:** या कार्यक्रमात उद्योजकता कौशल्यांचे मॉड्यूल्स समाविष्ट करणे, सहभागींमध्ये उद्योजकतेची भावना प्रज्वलित करणे आणि स्वयं-रोजगाराच्या संधी वाढवणे शक्य आहे.

### मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना महाराष्ट्र : फायदे

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना महाराष्ट्र मध्ये महाराष्ट्रातील तरुणांचे जीवन आणि राज्याचे आर्थिक परिदृश्य बदलण्याची अफाट क्षमता आहे. अपेक्षित फायद्यांचे जवळून निरीक्षण येथे आहे:

**कौशल्यांमधील अंतर भरून काढणे:** लक्ष्यित आणि व्यावहारिक प्रशिक्षण देऊन, ही योजना सध्याच्या कौशल्यांमधील

अंतर लक्षणीयरीत्या भरून काढू शकते. हे उद्योगाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी, आर्थिक वाढ आणि उत्पादकता वाढवण्यासाठी आवश्यक कौशल्यांसह सुसज्ज कर्मचारी वर्ग सुनिश्चित करते.

**वर्धित रोजगारक्षमता:** सहभागींना उद्योग-संबंधित कौशल्ये आणि कामाच्या अनुभवाने सुसज्ज करणे म्हणजे वाढीव रोजगारक्षमता. यामुळे बेरोजगारीचा दर कमी होतो आणि तरुणांना चांगल्या पगाराच्या नोकऱ्या सुरक्षित करण्यास सक्षम बनवते, ज्यामुळे जीवनमान सुधारते आणि एकूणच आर्थिक कल्याण होते.

**आर्थिक वाढ:** एक कुशल कामगार हा समृद्ध अर्थव्यवस्थेचा कणा असतो. युवा कार्य शिक्षण योजना, कुशल व्यावसायिकांचा समूह तयार करून, राज्याच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकते आणि आणखी गुंतवणूक आकर्षित करू शकते.

**नवोन्मेषाला चालना देणे:** व्यावहारिक शिक्षणाला चालना देऊन आणि संभाव्य उद्योजकीय मानसिकतेचे पालनपोषण करून, कार्यक्रम नाविन्यपूर्णतेला चालना देऊ शकतो. यातून महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला पुढे नेण्यासाठी नवीन कल्पना आणि उपायांचा विकास होऊ शकतो.

**सामाजिक उन्नती:** तरुणांना कौशल्य आणि रोजगाराच्या संधी देऊन सक्षम करून, ही योजना सामाजिक उन्नतीसाठी योगदान देऊ शकते. हे गरिबी दूर करू शकते, सामाजिक विषमता कमी करू शकते आणि अधिक समावेशक आणि समृद्ध समाजाचा मार्ग मोकळा करू शकते.

### मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत मिळणारे विद्यावेतन

महाराष्ट्रातील प्रत्येक बेरोजगार मुलगा मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना महाराष्ट्र अंतर्गत इंटर्न होण्यासाठी अर्ज करू शकतो. परिणामी या इंटर्नना मासिक रु. १०,००० त्यांच्या नोकरी व्यतिरिक्त स्टायपेंड मिळेल. अशा रीतीने राज्यभर बेरोजगारीचा प्रश्न सोडवला जाऊ शकतो. या कार्यक्रमाचा शुभारंभ माननीय अर्थमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शुक्रवार, २८ जून २०२४ रोजी महाराष्ट्राचा २०२४-२०२५ चे अर्थसंकल्पीय भाषण देताना करण्यात आला.

### मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचे पात्रता निकष :

अर्जदार हा महाराष्ट्राचा कायमचा रहिवासी असणे महत्वाचे आहे. इंटर्न झालेल्या बेरोजगार मुलांना दरमहा रु. १०,०००. जे किशोरवयीन मुले त्वरित सुरू करण्यास तयार आहेत त्यांनी मुख्यमंत्री युवा कार्य शिक्षण योजनेसाठी अर्ज करावा.

### मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना अर्ज प्रक्रिया

दुर्दैवाने, आज पर्यंत, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना महाराष्ट्र साठी विशिष्ट अर्ज प्रक्रियेची माहिती सार्वजनिकपणे उपलब्ध



नाही. ही योजना महाराष्ट्राच्या २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात अलीकडील घोषणा होती आणि अर्ज प्रक्रियेसारखे तपशील अद्याप विकसित होण्याची शक्यता आहे.

### तुम्ही अर्ज प्रक्रियेवर अपडेट राहण्याचे काही मार्ग येथे आहेत:

**महाराष्ट्र सरकारच्या वेबसाइट्स:** महाराष्ट्र सरकारच्या अधिकृत वेबसाइट्सवर लक्ष ठेवा, विशेषत: कौशल्य विकास किंवा कामगार विभागांशी संबंधित. अर्ज प्रक्रियेच्या तपशीलांची घोषणा करणारी ही वेबसाइट बहुधा पहिली असेल.

**बातम्या अद्यतने:** युवा कार्य शिक्षण योजनेशी संबंधित अद्यतनांसाठी महाराष्ट्रातील विश्वसनीय बातम्या स्त्रोतांचे अनुसरण करा. एकदा उपलब्ध झाल्यावर ते अर्ज प्रक्रियेचे तपशील जाहीर करू शकतात.

**सरकारी विभाग:** तुम्ही महाराष्ट्रातील संबंधित सरकारी विभागांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करू शकता जे कौशल्य विकास उपक्रम हाताळतात. ते तुम्हाला अर्ज प्रक्रियेच्या घोषणेसाठी टाइम लाइनवर अधिक माहिती प्रदान करण्यास सक्षम असतील.

### निष्कर्ष

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना महाराष्ट्रमध्ये महाराष्ट्रातील तरुणांसाठी खूप मोठे आश्वासन आहे, ज्यात उद्योग-संरेखित कौशल्य प्रशिक्षण, आर्थिक सहाय्य आणि संभाव्य उद्योजकता प्रोत्साहन यांचे अनोखे मिश्रण आहे. मजबूत पायाभूत सुविधा, सुव्यवस्थित निवड प्रक्रिया आणि मजबूत उद्योग भागीदारी यासह कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करून, या उपक्रमात कौशल्यातील अंतर भरून काढण्याची, रोजगारक्षमता वाढवण्याची आणि तरुण पिढीला सक्षम बनवण्याची क्षमता आहे, ज्यामुळे महाराष्ट्राचे भविष्य उज्वल होण्याचा मार्ग मोकळा होईल.

नवी दिल्ली : केंद्र सरकारने संसदेच्या अधिवेशनात मंगळवारी लोकसभेत अर्थसंकल्प सादर केला. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सलग सातव्यांदा अर्थसंकल्प सादर करून नवा विक्रम केला आहे. या अर्थसंकल्पात सर्वसाम न्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. सरकारने बिहार आणि आंध्रप्रदेशवर घोषणांचा वर्षाव केला. यासोबतच पुढील ५ वर्षांचे उद्दिष्ट सांगताना अर्थमंत्र्यांनी केंद्र सरकारचे नऊ प्राधान्यक्रम जाहीर केले. कृषी, रोजगार, सामाजिक न्याय, शहरी विकास, ऊर्जा सुरक्षा, पायाभूत सुविधा, नवकल्पना आणि सुधारणांमधील उत्पादकता आणि लवचिकता यांना प्राधान्य दिले जाणार असल्याचे अर्थसंकल्पात सांगण्यात आले.




# विकासपूरक सर्वसमावेशक बजेट

अर्थमंत्र्यांनी या अर्थसंकल्पाचे (Budget Highlights 2024) वर्णन गरीब, महिला, तरुण आणि शेतकरी यांचे बजेट असे केले. कर प्रणालीमध्ये बदल करण्यात आले असून, त्याअंतर्गत ३ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न आता करमुक्त असेल. त्याच वेळी, जुन्या कर प्रणालीमध्ये, अडीच लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावरील कर सवलत पूर्वीप्रमाणेच सुरू राहील. म्हणजेच सरकार हळूहळू नवीन कर प्रणालीकडे वाटचाल करत आहे. अर्थमंत्र्यांनी मध्यमवर्गीयांना फायदा व्हावा म्हणून स्टँडर्ड डिडक्शन ५० हजार रुपयांवरून ७५ हजार रुपये केले. शिवाय सरकारने रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी 'रोजगार लिंक्ड प्रोत्साहन योजना' जाहीर केली आहे. याशिवाय मुद्रा कर्ज योजनेअंतर्गत कर्जाची मर्यादा १० लाख रुपयांवरून २० लाख रुपयांपर्यंत केली जाणार असल्याचे सांगण्यात आले. इतकेच नाही तर महत्त्वाच्या खनिजांच्या आयातीवरील सीमाशुल्क हटवण्यात आले असून सोन्या-चांदीवरील सीमाशुल्कही कमी केले आहे.

### ■ वित्तीय तूट कमी करणे सरकारचे लक्ष्य

अर्थमंत्र्यानी सांगितले की, वित्तीय तूट ४.९ टक्क्यांवर आली आहे. २०२६ पर्यंत वित्तीय तूट कमी करुन ४.५ टक्क्यांपर्यंत आणण्याचे सरकारचे लक्ष्य असल्याचे निर्मला सीतारामन यांनी सांगितले. केंद्र सरकारने आपले भांडवली खर्चाचे उद्दिष्ट (अंतरिम अर्थसंकल्पात जाहीर केलेले) ११.११ ट्रिलियन रुपये जशास तसे ठेवले आहे.

### ■ बिहार आणि आंध्र प्रदेशसाठी विशेष पॅकेज

निर्मला सीतारामन यांनी बिहार आणि आंध्रप्रदेशसाठी अनेक घोषणा केल्या. अर्थमंत्र्यांनी चालू आर्थिक वर्षात आंध्र प्रदेशच्या विकासासाठी १५ हजार कोटी रुपयांची घोषणा केली. बिहारमध्ये रस्ते बांधणी, नवीन विमानतळ, वैद्यकीय महाविद्यालये आणि क्रीडासह पायाभूत सुविधांसाठी योजना जाहीर केल्या आहेत. त्यासाठी सीतारामन यांनी २६ हजार कोटी रुपयांची तरतूद केली. याशिवाय पर्यटनाला चालना देण्यासाठी बोधग्यामध्ये काशी विश्वनाथच्या धर्तीवर कॉरिडॉर बांधण्याची घोषणाही सरकारने केली.

### ■ कृषी क्षेत्रासाठी १.५२ लाख कोटी रुपये

अर्थमंत्र्यांनी यंदाच्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांकडे विशेष लक्ष दिले असून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी अनेक पावले उचलण्याची घोषणा केली आहे. सरकारने अर्थसंकल्पात शेतकरी आणि कृषी क्षेत्रासाठी १.५२ लाख कोटी रुपयांची तरतूद जाहीर केली. या निधीतून कृषी आणि संबंधित क्षेत्रासाठी योजना तयार करण्यात येणार आहेत. केंद्र सरकारचे लक्ष कृषी पायाभूत सुविधा मजबूत करणे, कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञानाला चालना देणे आणि नैसर्गिक शेतीकडे शेतकऱ्यांचा कल वाढवणे यावर केंद्रित आहे. मात्र, पंतप्रधान किसान सन्मान निधी आणि एमएसपीच्या रकमेत वाढ करण्याबाबत अर्थसंकल्पात कोणतीही घोषणा करण्यात आलेली नाही.

### ■ रेल्वे बजेटमध्ये जवळपास २० हजार कोटींची वाढ

केंद्र सरकारने रेल्वे बजेटमध्ये १९ हजार ९०० कोटींची वाढ केली आहे. अर्थमंत्र्यांनी २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी रेल्वेसाठी २ लाख ७८ हजार ५०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. तर गेल्या वर्षीचे बजेट २ लाख ५८ हजार ६०० कोटी रुपये होते.

### ■ संरक्षण खात्यासाठी ६.२२ लाख कोटी

अर्थमंत्र्यांनी २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी संरक्षण क्षेत्रासाठी ६.२२ लाख कोटी रुपयांचे बजेट जाहीर झाले आहे. हे बजेट सर्व मंत्रालयाच्या बजेटपेक्षा जास्त आहे.

### ■ अर्थसंकल्पात गृह मंत्रालयाला २.१९ लाख कोटी रुपये

अर्थसंकल्पात गृह मंत्रालयासाठी २ लाख १९ हजार ६४३ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ज्यामध्ये सीआरपीएफ, बीएसएफ आणि सीआयएसएफ सारख्या केंद्रीय पोलिस दलांसाठी १ लाख ४३ हजार २७५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. केंद्रीय अर्थमंत्र्यांनी जम्मू आणि काश्मीर केंद्रशासित प्रदेशासाठी ४२ हजार २७७ कोटी रुपये जाहीर केले आहेत. अंदमान निकोबार बेटांना ५ हजार ९८५ कोटी रुपये, चंदीगडला ५ हजार ८६२ कोटी रुपये आणि लडाखला ५ हजार ९५८ कोटी रुपये देण्यात आले आहेत. अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार, केंद्रीय मंत्रिमंडळाच्या खर्चासाठी १ हजार २४८ कोटी रुपये राखून ठेवण्यात आले आहेत आणि आपत्ती व्यवस्थापन, मदत - पुनर्वसन आणि राज्य सरकारांना अनुदान इत्यादींसाठी ६ हजार ४५८ कोटी रुपयांची तरतूद आहे.

■ **पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ११ लाख कोटींपेक्षा जास्त निधी :** देशातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी अर्थसंकल्पात ११ लाख ११ हजार १११ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही तरतूद देशाच्या जीडीपीच्या ३.४ टक्के आहे. पायाभूत सुविधांच्या विकासासाठी केंद्र सरकार राज्यांना दीड लाख कोटी रुपयांचे कर्ज देणार आहे. ज्यावर कोणतेही व्याज आकरले जाणार नाही.

■ **पहिल्या नोकरीवर ईपीएफओ खात्यात १५ हजार :** ईपीएफओमध्ये पहिल्यांदा नोंदणी करणाऱ्यांना पहिल्या नोकरीतील पगार १ लाख रुपयांपेक्षा कमी असल्यास सरकार त्यांना १५ हजार रुपयांची मदत करणार आहे. याचा फायदा २ कोटी १० लाखांपेक्षा जास्त तरुणांना होणार आहे. १ लाख रुपयांपेक्षा कमी पगार असलेल्या नोकरदारांना सरकार दरमहा ३ हजार रुपये ईपीएफओ योगदान म्हणून देणार आहे.

■ **उच्च शिक्षणासाठी १० लाख रुपयांपर्यंत कर्ज :** देशांतर्गत संस्थांमध्ये उच्च शिक्षणासाठी १० लाख रुपयांपर्यंत कर्ज देण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. या अंतर्गत दरवर्षी १ लाख विद्यार्थ्यांना कर्जाच्या रकमेवर ३ टक्के वार्षिक व्याज सवलतीसाठी थेट ई-व्हाउचर दिले जातील.

■ **एक कोटी घरांचे बांधकाम :** अर्थमंत्र्यांनी सांगितले की, पीएम आवास योजना अर्बन २.० अंतर्गत १० लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह, शहरी गरीब आणि मध्यमवर्गीय उत्पन्न कुटुंबांसाठी एक कोटी घरांचे बांधकाम पूर्ण केले जाईल. यामध्ये पुढील ५ वर्षांत २.२ लाख कोटी रुपयांच्या केंद्रीय मदतीचा समावेश असेल.

■ **शहरे ही विकासाची केंद्रे आहेत :** अर्थमंत्र्यांना सांगितले की, शहरांना विकास केंद्रे म्हणून विकसित करण्यासाठी केंद्र सरकार राज्यांसोबत काम करेल. त्या म्हणाल्या की, ३० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या १४ मोठ्या शहरांसाठी अंमलबजावणी आणि वित्तपुरवठा धोरणासह गतिशीलता-आधारित विकास योजना तयार केल्या जातील.

■ **पाणी पुरवठा आणि स्वच्छता :** पाणीपुरवठा आणि स्वच्छतेसाठी, केंद्र सरकार राज्य सरकारे आणि बहुपक्षीय विकास बँकांच्या भागीदारीत १०० प्रमुख शहरांसाठी पाणीपुरवठा, सांडपाणी प्रक्रिया, घनकचरा व्यवस्थापन आणि इतर आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य प्रकल्पांना प्रोत्साहन देईल.

■ **आठवडी बाजार :** अर्थमंत्र्यांनी सांगितले की, पीएम स्वनिधीच्या यशाच्या आधारे, रस्त्यावरील विक्रेत्यांच्या जीवनात बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने, केंद्र सरकार पुढील वर्षासाठी निवडक शहरांमध्ये १०० आठवडी बाजार किंवा स्ट्रीट फूड मार्केट्स स्थापन करणार आहे.

■ **मुद्रांक शुल्क :** ज्या राज्यांनी उच्च मुद्रांक शुल्क आकारणे सुरू ठेवले आहे त्यांना सरकार सर्वांसाठी मुद्रांक शुल्क दर कमी करण्याचा आणि महिलांनी खरेदी केलेल्या मालमत्तेसाठी शुल्क कमी करण्याचा विचार करण्यास प्रोत्साहित करणार आहे.

■ **रुपया कसा येणार? :** सरकारच्या उत्पन्नाचे अनेक स्त्रोत आहेत ज्यातून निधी गोळा केला जातो. आर्थिक सर्वेक्षण २०२४ च्या आकडेवारीनुसार, सरकारला आयकरातून १९ पैसे, कॉर्पोरेशन टॅक्समधून १७ पैसे, सीमा शुल्कातून ४ पैसे, केंद्रीय उत्पादन शुल्कातून ५ पैसे, जीएसटीतून १८ पैसे, नॉन-टॅक्स मधून ९ पैसे, कर्ज नसलेल्या भांडवलांमधून १ पैसा, कर्ज आणि इतर दायित्वांमधून २७ पैसे येणार आहेत.

■ **रुपया कसा जाणार? :** आर्थिक सर्वेक्षण २०२४ नुसार १ रुपया वेगवेगळ्या वस्तूंवर खर्च केला जाणार आहे. केंद्रीय क्षेत्रातील योजनांमध्ये १६ पैसे, १९ पैसे व्याज, ८ पैसे संरक्षण क्षेत्रात, ६ पैसे आर्थिक सहाय्य म्हणजे अनुदान, वित्त आयोग आणि इतर हस्तांतरणांवर ९ पैसे, २१ पैसे कर आणि फीमध्ये राज्यांना वाटा देण्यासाठी, केंद्र पुरस्कृत योजनांमध्ये ८ पैसे, पेन्शन देण्यासाठी ४ पैसे आणि इतर बाबींमध्ये ९ पैसे खर्च केले जाणार आहेत.



## 'या' वस्तू स्वस्त होणार

- कर्करोगाशी संबंधित तीन औषधांवर कस्टम ड्युटी हटवली. एक्स-रे ट्यूब आणि फ्लॅट पॅनल डिटेक्टरवरील आयात शुल्कही हटवण्यात आले.
- मोबाईल फोन आणि पार्ट्स- पीसीबी आणि मोबाईल फोन चार्जरवरील कस्टम ड्युटी १५ टक्क्यांनी कमी करण्यात आली आहे.
- २५ अत्यावश्यक खनिजांवर सीमाशुल्क नाही.
- सोलर सेल आणि सोलर पॅनेलच्या निर्मितीवर कर सवलत.
- सोने आणि चांदीवरील सीमाशुल्क ६ टक्के करण्यात आले. दागिने स्वस्त होतील.
- प्लॅटिनमवरील सीमाशुल्क आता ६.४ टक्के करण्यात आले आहे.

## 'या' वस्तू महागणार

- पीव्हीसी फ्लेक्स बॅनर आयात करणे महाग होईल.
- काही दूरसंचार उपकरणांची आयात महाग होईल. बेसिक कस्टम ड्युटी १०% वरून १५% झाली. मेक इन इंडिया अंतर्गत देशात तयार होणाऱ्या स्वस्त घरगुती उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी सरकारची घोषणा.
- एक वर्षापेक्षा जास्त काळ ठेवलेल्या इक्विटी गुंतवणूक महाग होतील. कर १५% वरून २०% करण्यात आला.
- एक वर्षापेक्षा जास्त काळ ठेवलेले शेअर्स महाग होतील. कर १० टक्क्यांवरून साडेबारा टक्के करण्यात आला.
- अमोनियम नायट्रेटवरील आयात शुल्कात १० टक्के वाढ करण्यात आली आहे.
- विघटन न होणारे प्लास्टिक महाग होईल. आयात शुल्कात २५ टक्के वाढ करण्यात आली आहे.

# उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी सादर केलेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पाची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे

- दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ रोजी राज्याचा २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा अंतरिम अर्थसंकल्प सादर केला होता, आता सन २०२४-२५ चा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर करण्यात आला.
- केंद्र शासनाच्या पहिल्याच मंत्रीमडंळ बैठकीत वाढवण बंदर प्रकल्पाला मंजूरी-एकूण किंमत ७६ हजार २०० कोटी रुपये -१० लाखांहून अधिक रोजगार निम र्ीती
- अतिरिक्त अर्थसंकल्पात महिला, शेतकरी, युवा, मागास वर्ग आणि सर्व समाजातील गरिबांना भरीव आर्थिक मदतीवर भर





## वारकरी बांधवांसाठी...

- पंढरपूरच्या वारीचा जागतिक वारसा नामांकनासाठी युनेस्कोकडे प्रस्ताव
- पंढरपूरच्या वारीला जाणाऱ्या मुख्य पालख्यातील दिंडींना प्रति दिंडी २० हजार रूपये
- 'निर्मल वारी'साठी ३६ कोटी ७१ लाख रुपयांचा निधी
- मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून देहू-आळंदी ते पंढरपूर या दोन्ही मुख्य पालखी मार्गावरील सर्व वारकऱ्यांची आरोग्य तपासणी, मोफत औषधोपचार

## महिलांसाठी विविध योजना

- सन २०२३-२४ पासून 'लेक लाडकी'योजनेची सुरुवात-मुलीच्या जन्मापासून ती अठरा वर्षाची होईपर्यंत तिला टप्याटप्याने एकूण एक लाख एक हजार रुपये
- 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना'२१ ते ६० वर्ष वयोगटातील पात्र महिलांना शासनामार्फत दरमहा दीड हजार रुपये-दरवर्षी सुमारे ४६ हजार कोटी रुपये निधी
- दिनांक १ मे, २०२४ नंतर जन्माला आलेल्या व्यक्तीच्या नावाची नोंद शासकीय दस्तऐवजांमध्ये त्याचे नांव, आईचे नांव, वडिलांचे नांव व आडनांव या क्रमाने करण्याचे बंधनकारक
- पिंक ई रिक्षा - १७ शहरांतल्या १० हजार महिलांना रिक्षा खरेदीसाठी अर्थसहाय्य - ८० कोटी रुपयांचा निधी
- शुभमंगल सामुहिक नोंदणीकृत विवाह योजनेत लाभार्थी मुलींना देण्यात येणारे अनुदान १० हजार रुपयांवरून २५ हजार रुपये
- राज्यातील सर्व आरोग्य उपकेंद्रात स्तन व गर्भाशयमुखाच्या कर्करोग तपासणीसाठी उपकरणे व साहित्यासाठी ७८ कोटी रुपये
- रुग्णांची विशेषतः गरोदर माता व बालकांची आरोग्य संस्थेत मोफत ने- आण करण्यासाठी ३ हजार ३२४ रुग्णवाहिका
- जल जीवन मिशन कार्यक्रमातून ग्रामीण भागातील १ कोटी २५ लाख ६६ हजार ९८६ घरांना नळजोडणी पूर्ण-राहिलेल्या २१ लाख ४ हजार ९३२ घरांसाठीचे काम प्रगतीपथावर
- 'मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजना'- वर्षाला घरटी तीन गॅस सिलेंडर मोफत देणार- ५२ लाख १६ हजार ४१२ लाभार्थी कुटुंबांना लाभ
- लखपती दिदी- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत ७ लाख नवीन गटांची स्थापना-बचत गटांच्या फिरत्या निधीच्या रकमेत १५ हजार रुपयांवरुन ३० हजार रुपये वाढ
- महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना 'उमेद मार्ट'आणि 'ई-कॉमर्स ऑनलाईन प्लॅटफॉर्म' याद्वारे आतापर्यंत १५ लाख महिला 'लखपती दिदी',या वर्षात २५ लाख महिलांना लखपती करण्याचे उद्दीष्ट
- महिला लघुउद्योजकांसाठी 'पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना'- अखिल भारतीय स्तरावरील महासंमेलनाचे राज्यात आयोजन
- 'आई योजनेअंतर्गत'पर्यटन क्षेत्रातील महिला लघुउद्योजकांना १५ लाख रुपयापर्यंतच्या कर्जावरील व्याजाचा परतावा -१० हजार रोजगार निर्मिती
- मुलींना मोफत उच्च शिक्षण- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वैद्यकीय

तसेच कृषि विषयक सर्व व्यावसायिक पदवी–पदविका अभ्यासक्रम ांसाठी प्रवेशित ८ लाख रूपयापर्यंतच्या वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्या इतर मागासवर्ग तसेच, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कामध्ये १०० टक्के प्रतिपूर्ती

- या निर्णयाचा अंदाजे २ लाख ५ हजार ४९९ मुलींना लाभ– सुमारे २ हजार कोटी रुपयांचा भार

## शेतकऱ्यांसाठी विविध योजना

- नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीपोटी जुलै, २०२२ पासून १५ हजार २४५ कोटी ७६ लाख रूपयांची मदत
- नोव्हेंबर – डिसेंबर, २०२३ मधील अवकाळी पावसामुळे बाधित झालेल्या २४ लाख ४७ हजार शेतकऱ्यांना २ हजार २५३ कोटी रुपयांची मदत
- नुकसानीच्या क्षेत्राची मर्यादा दोनऐवजी तीन हेक्टर करुन राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषापेक्षा अधिक दराने मदत
- खरीप हंगाम २०२३ करिता ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ तर १ हजार २१ महसूल मंडळांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करून विविध सवलती लागू
- नुकसानीचे पंचनामे जलद व पारदर्शी होण्यावसाठी ई–पंचनामा प्रणाली संपूर्ण राज्यात लागू
- 'नमो शेतकरी महासन्मान निधी योजने' अंतर्गत एकूण ९२ लाख ४३ हजार शेतकरी कुटुंबांना ५ हजार ३१८ कोटी ४७ लाख रुपये अनुदान
- 'एक रुपयात पीक विमा योजने'अंतर्गत ५९ लाख ५७ हजार शेतकऱ्यांना ३ हजार ५०४ कोटी ६६ लाख रुपये रक्कम अदा
- 'गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजने'अंतर्गत २ हजार ६९४ शेतकरी कुटुंबांना ५२ कोटी ८२ लाख रुपयांचे अनुदान वाटप
- 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने'अंतर्गत पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या १४ लाख ३३ हजार शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर रक्कम म्हणून ५ हजार १९० कोटी रुपये अदा केले, उर्वरित रकमेचे वाटप त्वरीत
- नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा ६ हजार कोटी रुपये किमतीचा दुसरा टप्पा २१ जिल्ह्यांत राबविण्यात येणार
- मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पातंर्गत १ हजार ५६१ कोटी ६४ लाख रुपये किमतीच्या ७६७ उपप्रकल्पांना मंजूरी– सुमारे ९ लाख शेतकऱ्यांना लाभ
- विदर्भ आणि मराठवाडयातील १४ विपत्तीग्रस्त जिल्हयातील केशरी शिधापत्रिकाधारक ११ लाख ८५ हजार शेतकरी लाभार्थींना मे २०२४ अखेर ११३ कोटी ३६ लाख रुपये थेट रोख रक्कम अदा
- राष्ट्रीय कृषी विकास योजना आणि राज्यपुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजनेतून गेल्या तीन वर्षात २ लाख १४ हजार शेती उपकरणांच्या खरेदीसाठी १ हजार २३९ कोटी रुपये अनुदान
- 'गाव तेथे गोदाम'या नवीन योजनेत पहिल्या टप्प्यात १०० नवीन गोदामांचे बांधकाम तसेच अस्तित्वातील गोदामांची दुरुस्ती
- कापूस, सोयाबीन तसेच अन्य तेलबियांच्या उत्पादकतेत वाढ आणि मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजना– सन २०२४–२५ मध्ये ३४१ कोटी रुपये निधी



- आधारभूत किंमतीनुसार खरीप व रब्बी हंगाम ातील कडधान्य व तेलबियांच्या नाफेडमार्फत खरेदीसाठी १०० कोटी रुपयांचा फिरता निधी
- खरीप पणन हंगाम २०२३–२४ मध्ये कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रति हेक्टरी ५ हजार रुपयांचे अर्थसहाय्य
- कांदा उत्पादक शेतकऱ्यांना सन २०२३–२४ मध्ये ३५० रुपये प्रति क्विंटलप्रमाणे ८५१ कोटी ६६ लाख रुपये अनुदान
- कांदा आणि कापसाची हमीभावाने खरेदी करण्यासाठी प्रत्येकी २०० कोटी रुपयांचा फिरता निधी
- खरीप पणन हंगाम २०२३–२४ मध्ये ६ लाख धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २० हजार रुपयांप्रमाणे १ हजार ३५० कोटी रुपये प्रोत्साहन रक्कम प्रदान
- नोंदणीकृत २ लाख ९३ हजार दूध उत्पादकांना प्रतिलिटर ५ रुपयांप्रमाणे २२३ कोटी ८३ लाख रुपये अनुदान वितरीत ,राहिलेले अनुदानही त्वरित वितरीत करणार
- दूध उत्पादक शेतकऱ्यांना आधार देण्याकरीता प्रतिलिटर पाच रुपयांप्रमाणे अनुदान देण्याची योजना जुलै, २०२४ पासून पुढे चालू ठेवण्यात येणार
- अटल बांबू समृद्धी योजनेतून १० हजार हेक्टर खाजगी क्षेत्रावर बांबूची लागवड –प्रतिरोपासाठी १७५ रूपये अनुदान
- राज्यातील पडीक जमीनीवर मोठया प्रमाणात बांबूची लागवड – नंदुरबार जिल्ह्यात १ लाख २० हजार एकर क्षेत्रावर बांबूची लागवड

## युवा वर्गासाठी विविध योजना

- मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना– दरवर्षी १० लाख तरुण–तरुणींना प्रत्यक्ष कामावरील प्रशिक्षण देण्यासाठी 'मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना' – प्रति प्रशिक्षणार्थी दरमहा १० हजार रुपयांपर्यंत विद्यावेतन –दरवर्षी सुमारे ६ हजार कोटी रुपये खर्च

- शासनाच्या योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी दरवर्षी ५० हजार युवकांना कार्यप्रशिक्षण
- जागतिक बँक सहाय्यित २ हजार ३०७ कोटी रुपये किमतीचा 'मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान आणि कौशल्य विकास' – ५०० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची दर्जावाढ, मॉडेल आय.टी. आय, जागतिक कौशल्य केंद्र, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, डेटा सेंटर अशा विविध संस्थांचे बळकटीकरण
- मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, यवतमाळ, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, कराड जिल्हा सातारा, अवसरी खुर्द जिल्हा पुणे, येथील तंत्रशिक्षण संस्थांमध्ये 'सेंटर ऑफ एक्सलन्स'स्थापन करण्यास मान्यता
- पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा व नमो महारोजगार मेळाव्यातून सन २०२३–२४ मध्ये ९५ हजार ४७८ उमेदवारांची नोकरीसाठी निवड
- 'स्वामी विवेकानंद आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास प्रबोधिनी'मुंबईत गोवंडी येथे कार्यान्वित – ग्रामीण भागात ५११ 'प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रे'स्थापन – १५ ते ४५ वयोगटातील १८ हजार ९८० उमेदवारांना कौशल्य प्रशिक्षण
- आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टीआरटीआय), डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी), महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र संशोधन व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) इत्यादी संस्थांमार्फत एकूण २ लाख ५१ हजार ३९३ विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण– ५२ हजार ४०५ विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी प्राप्त
- संशोधन व नवउपक्रम केंद्रांसाठी विद्यापीठ व शासनाकडून प्रत्येकी ५० कोटी असा एकूण १०० कोटी रुपयांचा निधी
- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत स्वयंरोजगार अर्थसहाय्याच्या योजनांसाठी १०० कोटी रुपये निधीची तरतूद
- अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांसाठीदेखील सन २०२४–२५ पासून विदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना लागू
- इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेअंतर्गत दरवर्षी ३८ ते ६० हजार रुपयांपर्यंत निवासभत्ता
- गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार विकास महामंडळामार्फत ऊसतोड कामगारांच्या मुलामुलींसाठी ८२ शासकीय वसतीगृहे स्थापन करण्यास मंजूरी
- राज्यात सध्या असलेले १ लाख लोकसंख्येमागे ८४ डॉक्टरचे प्रमाण सन २०३५ पर्यंत हे प्रमाण १०० हून अधिक करण्यासाठी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेची नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि ४३० खाटांची संलग्न रुग्णालये स्थापन करण्यास मान्यता
- मौजे सावर, तालुका म्हसळा, जिल्हा रायगड येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय युनानी महाविद्यालय स्थापन करण्यास मान्यता , बुलढाणा जिल्ह्यात नवीन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय
- शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ निवासी डॉक्टर यांच्या विद्यावेतनात तसेच मानसेवी अध्यापकांच्या मानधनात भरीव वाढ



- थ्रस्ट सेक्टरमधे अंदाजे १ लाख कोटी रुपयांची गुंतवणुक– ५० हजार रोजगार निर्मिती
- हरित हायड्रोजन– २ लाख ११ हजार ४०० कोटी रुपयांची गुंतवणूक– ५५ हजार ९०० रोजगार निर्मिती
- महापे, नवी मुंबई येथे २५ एकर जागेवर 'इंडिया जेम्स न्ड ज्वेलरी पार्क'नियोजित– २ हजार सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटकांचा समावेश–५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक – एक लाख रोजगार निर्मिती
- एकात्मिक व शाश्र्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३ ते २०२८– पाच वर्षात २५ हजार कोटी रुपयांची भरीव गुंतवणूक–५ लाख रोजगार निर्मिती
- खाजगी गुंतवणूक वाढविण्यासाठी लघु–वस्त्रोद्योग संकुले तसेच टेक्निकल टेक्सटाईल पार्क उभारण्यात येणार
- सिंधुदुर्ग जिल्हयात आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्कुबा डायव्हींग केंद्र– २० कोटी रुपये खर्च अपेक्षित – ८०० स्थानिकांना रोजगार

## पायाभूत सुविधा आणि अन्य क्षेत्रातील महत्वाच्या योजना

- मुंबई, पुणे व नागपूर शहरांमध्ये एकूण ४४९ किलोमीटर लांबीच्या मेट्रो मार्गिका उभारण्यास मान्यता –१२७ किलोमीटर लांबीच्या मार्गिका वाहतुकीसाठी खुल्या – या वर्षात आणखी ३७ किलोमीटर लांबीच्या मार्गिका वाहतुकीसाठी खुल्या करण्यात येणार
- शिवडी–वरळी जोडरस्त्याचे काम डिसेंबर २०२५ अखेर पूर्ण करण्यात येणार
- ठाणे किनारी मार्ग– लांबी १३.४५ किलोमीटर – ३ हजार ३६४ कोटी रुपये किमतीचे काम मे २०२८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित
- प्रधानमंत्री ग्रामसडक योजना– तिसऱ्या टप्पा–सुमारे ६ हजार ५०० किलोमीटर लांबीच्या रस्ते सुधारणांचे उद्दीष्ट –२ हजार ३०३ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची कामे पूर्ण
- मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या तिसऱ्या टप्प्यात २३ हजार

किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची कामे ३ वर्षात पूर्ण करण्यात येणार

- भगवान बिरसा मुंडा जोडरस्ते योजनेसाठी १ हजार ४०० कोटी रुपयांची तरतूद
- संत सेवालाल महाराज जोडरस्ता योजना तसेच यशवंतराव होळकर जोडरस्ते योजनेची लवकरच अंमलबजावणी
- १९ महानगरपालिकांमध्ये पीएम ई-बस सेवा योजना राबविण्यात येणार
- 'ड'वर्ग महानगरपालिका, सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये अग्निशमन सेवांचा विस्तार आणि आधुनिकीकरणासाठी ६१५ कोटी रुपयांची योजनाराबविण्यात येणार
- धर्मादाय आयुक्तांच्या अधिपत्याखालील कार्यालयांच्या मुंबई, नंदूरबार, नांदेड, वर्धा, अमरावती आणि कोल्हापूर येथील इमारतींच्या बांधकामासाठी तसेच अस्तित्वातील इमारतींच्या नूतनीकरणासाठी १२५ कोटी रुपयांचा निधी
- मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेअंतर्गत २ हजार ५६७ ग्रामपंचायत कार्यालयांच्या बांधकामांना मान्यता देण्यात आली आहे.
- जागतिक वारसा नामांकनासाठी शिवकालीन १२ किल्ल्यांचा युनेस्कोकडे प्रस्ताव पाठविला, कोकणातील कातळशिल्पे, पंढरपूर वारी, दहीहंडी उत्सव आणि गणेशोत्सव याबाबतचे प्रस्तावही पाठविण्यात येणार
- शासनाकडून रायगड किल्ल्यावर शिवराज्याभिषेक सोहळा दरवर्षी साजरा करणार
- वेंगुर्ला, जिल्हा सिंधुदुर्ग येथे ६६ कोटी रुपये अंदाजित किंमतीचा आंतरराष्ट्रीय दर्जाचा पाणबुडी प्रकल्प
- सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील पर्यटनस्थळांच्या विकासासाठी ३८१ कोटी ५६ लाख रुपये किमतीचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा मंजूर
- कल्याण-नगर मार्गा माळशेज घाटात सर्व सोयींनीयुक्त अत्याधुनिक व्ह्युईंग गॅलरी उभारण्यात येणार
- नागपूर जिल्ह्यातील रामटेक विकास आराखड्याच्या दुसऱ्या टप्प्यात २११ कोटी रुपये किमतीची कामे हाती घेण्यात येणार
- अध्यात्मिक गुरु तथा समाजसुधारक महानत्यागी बाबा जुमदेवजी यांचे स्मारकासाठी पावडदौना, तालुका मौदा, जिल्हा नागपूर येथे विकास ७७ कोटीचा आराखडा तयार करणार
- संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीची जिथे रचना केली त्या नेवासा येथील मंदिर परिसराचा विकास आराखडा तयार करणार
- कोल्हापूर शहरातील राजाराम तलावाकाठी अत्याधुनिक आंतरराष्ट्रीय कन्व्हेंशन सेंटर उभारण्यात येणार



- बी.जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे येथे बहुउद्देशिय सभागृह उभारण्याकरीता तसेच किसान शिक्षण प्रसारक मंडळ,बोरगाव-काळे तालुका जिल्हा लातूर या शैक्षणिक संस्थेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त आवश्यक निधी उपलब्ध करुन देणार
- छत्रपती संभाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या शिराळा, जिल्हा सांगली येथे त्यांचे स्मारक उभारणार
- संत श्री रुपलाल महाराजांचे समाधीस्थळ असलेल्या अंजनगाव सुर्जी, जिल्हा अमरावती येथे त्यांचे स्मारक उभारण्यात येणार
- आदिवासी कलांचे प्रदर्शन,वृध्दी आणि कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी हतगड तालुका सुरगाणा जिल्हा नाशिक येथे कलादालन स्थापन करण्यात येईल.
- मुंबई येथील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या ३०५ कोटी रुपये किमतीच्या आराखड्यास मान्यता
- जिल्हास्तरावर संस्थात्मक क्षमता वाढवून विकासाला चालना देण्यासाठी 'महास्ट्राईड'हा २ हजार २३२ कोटी रुपये किमतीचा प्रकल्प जागतिक बँकेच्या सहाय्याने राबविण्यात येणार
- मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना- राज्यातील ४४ लाख ६ हजार शेतकऱ्यांच्या ७.५ अश्र्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेतीपंपांना पूर्णत: मोफत वीज पुरवली जाणार- १४ हजार ७६१ कोटी रुपये अनुदान देण्यात येणार
- राज्यातील सर्व योजनांचे लाभ पात्र लाभार्थींपर्यंत थेट पोहोचावेत यासाठी योजनांचे मूल्यमापन करुन त्यांचे सुसूत्रीकरण करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करणार

## एकूण खर्चासाठी ६ लाख १२ हजार २९३ कोटी

- सन २०२४-२५ मध्ये जिल्हा वार्षिक योजना १८ हजार १६५ कोटी रुपयांचा नियतव्यय
- वार्षिक योजना २०२४-२५ मध्ये कार्यक्रम खर्चासाठी एक लाख ९२ हजार कोटी रुपये
- अनुसूचित जाती उपयोजनेकरीता १५ हजार ८९३ कोटी रुपये, आदिवासी विकास उपयोजनेकरीता१५ हजार ३६० कोटी रुपये नियतव्यय
- सन २०२४-२५ मध्ये एकूण खर्चासाठी ६ लाख १२ हजार २९३ कोटी रुपयांची तरतूद
- महसूली जमा ४ लाख ९९ हजार ४६३ कोटी रुपये,महसुली खर्च ५ लाख १९ हजार ५१४ कोटी रुपये
- महसुली तूट २० हजार ५१ कोटी रुपये, राजकोषीय तूट १ लाख १० हजार ३५५ कोटी रुपये

# नंदुरबार जिल्ह्यात ॲग्रो क्लस्टर व बांबू क्लस्टरला चालना देण्यासाठी प्रयत्न - ललित गांधी

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या बैठकीत निर्णय; अध्यक्ष ललित गांधी यांचे मार्गदर्शन







**नंदुरबार डिस्ट्रिक्ट इंडस्ट्रियल असोसिएशन व नंदुरबार डिस्ट्रिक्ट डेव्हलपमेंट कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने अध्यक्षांचा संवाद कार्यक्रम प्रसंगी चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांचा सत्कार करताना पदाधिकारी दुसऱ्या छायाचित्रात कार्यक्रमास मार्गदर्शन करताना ललित गांधी व्यासपीठावर उपाध्यक्षा सौ. संगीता पाटील, विश्वस्त कैलास अग्रवाल, पिकेश अग्रवाल, नंदुरबार डिस्ट्रिक्ट डेव्हलपमेंट कौन्सिलचे आशिष वाणी, उद्योजक कृष्णा अग्रवाल, लघु उद्योग भारतीचे जिल्हाध्यक्ष गजेंद्र चौधरी, प्रकाश पाटील, ईश्वर पाटील.**

नंदुरबार : एनडीडीसी व उद्योजकांच्या मागण्या पूर्ण करण्याची ग्वाही देत ॲग्रो-क्लस्टर, बांबू क्लस्टर उभारण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ॲण्ड डिस्ट्रिक्ट डेव्हलपमेंट कॉन्सिलचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.

येथील अग्रवाल भवनात नंदुरबार डिस्ट्रिक्ट इंडस्ट्रियल असोसिएशन आणि नंदुरबार डिस्ट्रिक्ट डेव्हलपमेंट कौन्सिल यांच्या वतीने महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरचे नवनिर्वाचित अध्यक्ष ललित गांधी आणि इतर पदाधिकारी यांचा संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

जिल्ह्यातील औद्योगिक विकासात दिशा आणि गती मिळावी या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ललित गांधी यांच्यासह कैलास अग्रवाल, संगीता पाटील, गजेंद्र चौधरी, आशिष वाणी, पिकेश अग्रवाल, कृष्णा अग्रवाल, प्रकाश कोचर, ईश्वर पाटील, आदी उपस्थित होते.

ललित गांधी यांनी सांगितले, जिल्ह्यातील उद्योजकांकडून महाराष्ट्र आणि भारताच्या औद्योगिक इतिहासाच्या अभ्यासाची, त्यातून धडे घेण्याची आणि जिल्ह्यातील औद्योगिक विकासाचे स्वप्न पूर्ण करण्याची अपेक्षा व्यक्त केली. महाराष्ट्राचे सुपुत्र शेठ वालचंद हिराचंद यांच्या गौरवार्थ त्यांच्या माहीत नसलेल्या अनेक औद्योगिक उपलब्धींची माहिती गांधी यांनी उपस्थितांना दिली. अनेक महत्त्वाच्या उद्योग निर्मितीसाठीचे प्रोत्साहन वालचंद हिराचंद यांनी दिल्याचा त्यांनी उल्लेख केला. त्यातून प्रेरणा घेऊन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स शतकीय कारकिर्दीकडे वाटचाल करीत असल्याचे गांधी म्हणाले. डिस्ट्रिक्ट कौन्सिलच्या, विकसित नंदुरबार जिल्हा या संकल्पनांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. यादरम्यान

### जिल्ह्यात विविध संघटनांतर्फे विकासाचे प्रयत्न...

- आशिष वाणी यांनी नंदुरबार डिस्ट्रिक्ट डेव्हलपमेंट कॉन्सिलतर्फे राबवण्यात येत असलेल्या विकसित नंदुरबार जिल्हा २०५० या उपक्रमाच्या माध्यमातून उद्योगविषयक झालेल्या अभ्यासातून समोर आलेल्या जिल्ह्याच्या उद्योगविषयी जन-आकांक्षा, अपेक्षा आणि निर्धार याबद्दल सभागृहास अवगत करून दिले. जिल्ह्याच्या कृषी-पूरक उद्योगासाठीची संसाधने, तयार असलेला अभ्यास, संशोधन याबद्दल माहिती देत जिल्ह्यात कृषी आधारित उद्योगांसाठीचे स्वतंत्र इंक्युबेशन सेंटर, स्किल डेव्हलपमेंट सेंटर, ॲग्रो क्लस्टर या संदर्भातील गरज अधोरेखित केली.
- चेंबरचे विश्वस्त कैलास अग्रवाल यांनी नंदुरबार जिल्ह्यातील उद्योजकांचे विशेषतः लघुउद्योजकांचे प्रोत्साहनपर मनोगत व्यक्त केले.
- चेंबरच्या उत्तर महाराष्ट्र विभाग उपाध्यक्षा संगीता पाटील यांनी जिल्ह्यातील उद्योग विश्वात महिलांच्या सक्रिय सहभागाविषयी अपेक्षा व्यक्त करत नंदुरबारच्या स्थानिक लोककला, संस्कृती या माध्यमातून तयार झालेल्या वस्तूंना विपणन क्षेत्राशी जोडून घेऊन नवे व्यापारी दालन उघडण्याची गरज असल्याचे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले.

नंदुरबारला एक स्वतंत्र कौशल्य विकास केंद्र, इनक्युबेशन सेटर, ॲग्रो क्लस्टर, बांबू उत्पादन, तसेच बांबूच्या वस्तूंचे उत्पादन आणि विपणन यासाठी केंद्र स्थापन करण्याची घोषणा यावेळी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे करण्यात आली.

जिल्ह्यातील उद्योजकांनी कमतरतांचे रडगाणे न गाता आव्हाने स्वीकारून इतरांसाठी आदर्श स्थापन करीत नंदुरबार जिल्हा औद्योगिक वसाहतीला क्रमांक एक वर नेण्याची जिद्द बाळगावी, असे आवाहनदेखील केले. यावेळी नंदुरबार येथे चेंबर ऑफ कॉमर्सचे जिल्हा कार्यालय स्थापण्यासाठीदेखील प्रयत्न होणार

असल्याचे त्यांनी सांगितले. नंदुरबार डिस्ट्रिक्ट इंडस्ट्रियल असोसिएशनच्या वतीने पिकेश अग्रवाल यांनी मनोगत व्यक्त करीत जिल्ह्यातील उद्योगासंबंधीची सद्यःस्थिती, जिल्ह्याची भौगोलिक व सामाजिक रचना, आकांक्षित जिल्ह्यामध्ये उद्योग उभारणीसाठीच्या अडचणी आणि उद्योजकांच्या अपेक्षा यावर प्रकाश टाकला.

लघुउद्योग भारतीचे जिल्हा अध्यक्ष गजेंद्र चौधरी व उद्योजक व नंदुरबार डिस्ट्रिक्ट डेव्हलपमेंट कौन्सिलचे पिकेश अग्रवाल यांची महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या गव्हर्निंग कौन्सिल सदस्यपदी नेमणुकीची घोषणादेखील यावेळी ललित गांधी यांनी केली. नाशिक येथील चेंबरचे सहसचिव अविनाश पाठक, दिलीप साळवेकर उपस्थित होते. सूत्रसंचालन नीरज देशपांडे यांनी कले. आभार प्रदर्शन गजेंद्र चौधरी यांनी मानले यावेळी मोठ्या संख्येने व्यापारी, उद्योजक उपस्थित होते.

# विकसित भारताच्या संकल्पनेवर आधारित कृषी, उद्योग, युवा रोजगार यावर भर देणारा विकास पूरक अर्थसंकल्प : ललित गांधी

## महिला व युवकांच्या उद्यमशीलतेला बरोबर विशेष प्राधान्य

मुंबई : विकसित भारताच्या संकल्पनेवर आधारित कृषी, उद्योग, युवा रोजगार यावर भर देणारा विकासपूरक अर्थसंकल्प आहे. असे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, कृषी क्षेत्राच्या दृष्टीने उत्पादकता वाढावी यावर विशेष भर दिला जाणार असून तेल–बिया संदर्भांमध्ये आत्मनिर्भरता आणली जाणार आहे. नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन दिले जाणार असून १ कोटी शेतकऱ्यांना त्यादृष्टीने सर्व मदत केली जाणार आहे. वातावरणात व हवामानात होणारे बदल लक्षात घेऊन अधिक उत्पादन देणाऱ्या १०९ जाती या वितरित केल्या जाणार आहेत. तसेच नाबार्डच्या माध्यमातून निर्यात विषयक कृषी मालाला सहाय्य केले जाणार आहे.

देशात मोठ्या प्रमाणावर उत्पादन क्षेत्रामध्ये रोजगार निर्माण व्हावा तसेच कौशल्य विकासही साधावा यादृष्टीने २० लाख तरुणांना १ हजार प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट आहे. १ हजार आयटीआय यांचे कालानुरूप आवश्यक असे अद्यावतीकरण करण्यात येणार आहे. जे नवीन कामगार कारखान्यातून कामाला लागतील अशा २१० लाख युवकांना त्यांचा पहिल्या महिन्याचा पगार ३ हप्त्यात शासन देणार आहे. तसेच कामगारांचे प्रॉव्हिडंट फंडाचे मालकाचे दरमहा रुपये ३ हजार पर्यंतचे हप्ते २ वर्षासाठी सरकार परत करणार आहेत. या तरतुदी अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे ही ललित गांधी यांनी सांगितले.

महिलांना अधिक प्रमाणावर रोजगार मिळावा यादृष्टीने काम गार महिलांसाठी होस्टेल निर्माण केली जाणार आहेत. युवकांना उच्च शिक्षणाच्या दृष्टीने रुपये १० लाखपर्यंतचे शैक्षणिक कर्जही दिले जाणार असून त्यामध्ये ३% व्याज सूटही मिळणार आहे.

**एमएसएमईला प्राधान्य**

एमएसएमईसाठी अर्थ सहाय्य मिळावे म्हणून त्यांच्या कठीण काळातही अर्थ पुरवठा केला जाणार आहे व त्यांच्या टर्म लोनसाठी देखील सरकार क्रेडिट गॅरंटीची हमी देणार आहे. मुद्रा लोनची मर्यादा वाढवून रुपये २० लाख अशी करण्यात आली आहे. तसेच देशात १२ इंडस्ट्रियल पार्क उभे केले जाणार आहेत.

जीएसटीमध्ये अधिक सुलभता व सोपेपणा आणला जाणार असून आयकर कायद्याचा एकूणच पूर्ण आढावा घेऊन सुटसुटीत कायदा करण्याचे सूतोवाच केले आहे. व्यवसाय सुलभतेसाठी हे आवश्यक होते आणि त्यादृष्टीने महाराष्ट्र चेंबरने वेळोवेळी सूचनाही केल्या आहेत. तसेच कौशल्य विकासाच्या दृष्टिकोनातून चेंबरच्या माध्यमातूनही आवश्यक ते प्रयत्न केले जात आहेत.

एकूण विचार करता कृषी उद्योग, दळणवळण, रोजगार, कौशल्य विकास अशा विविध क्षेत्रातील विकासाला प्रोत्साहन देणारा अर्थसंकल्प सादर करून पुढील पाच वर्षातील दिशा दर्शवली आहे. खास करून एम.एस. एम.इ. क्षेत्रातील कर्ज पुरवठा सहज आणि लवकर व्हावा, त्याला सरकारची हमी मिळावी यासाठी केलेली तरतूद महत्त्वाची आहे असे सांगून ललित गांधी यांनी या अर्थसंकल्पाचे स्वागत केले.

# अमळनेर मध्ये नवीन एमआयडीसीच्या जागेसाठी शासनाकडे पाठपुरावा करू - अध्यक्ष ललित गांधी

## अमळनेर येथे व्यापारी उद्योजकांशी संवाद





**अमळनेर जिल्हयातील विविध संघटनांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संवाद अध्यक्षांशी कार्यक्रमाप्रसंगी चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांचा सत्कार करताना पदाधिकारी, दुसऱ्या छायाचित्रात अमळनेरच्या माजी नगराध्यक्षा सौ. जयताई पाटील यांचा सत्कार करताना अध्यक्ष ललित गांधी सोबत वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, संगीता पाटील, संजय सोनवने, माजी जिल्हा बँक संचालिका सौ. तिलोत्तमाताई पाटील**

नंदुरबार येथील कार्यक्रमानंतर दुपारी ४ वाजता अमळनेर व्यापारी अडत असोसिएशन, अमळनेर मार्केट यार्ड व्यापारी संघटना, अमळनेर व्यापारी महिला महासंघ, अमळनेर व्यापारी महासंघ,अमळनेर एमआयडीसी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र चेंबरचे नवनिर्वानिर्वाचित पदाधिकारी यांच्या सत्काराचा कार्यक्रम व व्यापारी-उद्योजकांशी संवाद कार्यक्रमाचे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयात आयोजित करण्यात आला होता.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सत्काराला उत्तर देतांना अमळनेरमधील महिलांचे काम कौतुकास्पद असून महिलांना मदतीचा हात देत महिलांसाठी महिला क्लस्टर, कौशल्य विकास केंद्र व महिलांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबवून अमळनेरच्या व्यापार उद्योगांना चालना देणार, सहकारी औद्योगिक वसाहतीत पायाभूत सोयीसुविधा मिळण्यासाठी शासनाकडून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र चेंबर काम करेल असे आश्वासन दिले. तसेच अमळनेरमधील व्यापार उद्योगाच्या वाढीसाठी, मार्केटिंग व बाजारपेठ मिळवून देण्यासाठी मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरम सुरु करावा, नवीन एमआयडीसीसाठी अमळनेरमधील शासनाची जागा असल्यास तसा प्रस्ताव दिल्यास शासनाकडे पाठपुरावा करू असे व्यापारी अध्यक्ष गांधी यांनी सांगितले.

वेदांशु पाटील यांच्या पुढाकाराने स्थानिक व्यापारी-उद्योजकांच्या असोसिएशनच्या प्रतिनिधींनी सत्कार व संवाद कार्यक्रम आयोजित केला होता.

याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र मानगवे उपाध्यक्ष संजय सोनवणे, उपाध्यक्ष सौ. संगीता पाटील, माजी नगराध्यक्षा सौ. जयताई पाटील, माजी जिल्हा बँक संचालिका सौ. तिलोत्तमाताई पाटील, मार्केट कमिटीचे जेष्ठ संचालक हरी भिका वाणी, खान्देश शिक्षण मंडळाचे संचालक नीरज अग्रवाल, वेदांशु पाटील उपस्थित होते.

सुरवातीला महाराष्ट्र चेंबरचे नवनिर्वाचित अध्यक्ष ललित गांधी यांचा सत्कार मार्केट कमिटीचे जेष्ठ संचालक हरी भिका वाणी यांनी पुष्पगुच्छ देऊन केला. तसेच वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र मानगवे, उपाध्यक्ष संजय सोनवणे, उपाध्यक्ष सौ संगीता पाटील, उत्तर महाराष्ट्र शाखा चेअरमन अंजु सिंघल, को-चेअरमन भावेश मानेक, प्रफुल्ल संचेती, मंदार वाईकर, स्वप्निल जैन, माजी नगराध्यक्षा सौ. जयताई पाटील, माजी जिल्हा बँक संचालिका सौ. तिलोत्तमाताई पाटील, मार्केट कमिटीचे जेष्ठ संचालक हरी भिका वाणी या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी नीरज अग्रवाल यांनी उद्योगांसाठी जागा नाही एम आयडीसीत पाणी, रस्ता, वीज यासह पायाभूत सुविधा नसून शासनाकडून निधी मिळत नसल्याचे सांगितले. इन्कम टॅक्स व

जीएसटी नियमांची परिभाषा वेगळी असल्याने आडत व्यापाऱ्यांना स्क्रुटिनीच्या नोटिसा येत असून ते चुकीचे आहे. उद्योगाला जीएसटीचे रिफंड मिळत नाही यासाठी चेंबरने पाठपुरावा करून मदत करावी असे सांगितले. अजय आहुजा यांनी इन्कम टॅक्सच्या अडचणी सांगून इन्फ्रास्ट्रक्चर नीट नसल्यामुळे ग्रीव्हन्स कमिटीचे काम नीट होत नसल्याचे सांगितले. एमआयडीसीचे अध्यक्ष जगदीश चौधरी यांनी १९७५ असून एमआयडीसी आहे मात्र रस्ते, पाणी नाही त्यामुळे उद्योग येत नाही. पायाभूत सुविधा मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करावा, ९० टक्के व्यापार ऑनलाईन झाला असून त्याचा परिणाम स्थानिक व्यापार उद्योगांवर झाला असून करामध्ये सवलत मिळावी, अमेय मुंदडा व अमळनेर व्यापारी महिला संघटनेच्या सौ. शितल सावंत यांनी अमळनेरमधील व्यापार उद्योगांच्या विविध अडचणी मांडल्या.

वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र मानगवे उपाध्यक्ष संजय सोनवणे, उपाध्यक्ष सौ. संगीता पाटील यांनी मार्गदर्शन केले.

अध्यक्ष ललित गांधी व सौ. जय पाटील यांनी वेंदाशु पाटील यांचे कौतुक केले. याप्रसंगी स्वागत नीरज अग्रवाल यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वेदांशू पाटील यांनी केले.

कार्यक्रमास आदित्य बिल्डर्स चे प्रशांत निकम, मार्केट कमिटीचे संचालक प्रकाश वाणी, अमळनेर एम आय डी सी चे अध्यक्ष जगदीश चौधरी, व्यापारी उद्योजक संघटनांचे पदाधिकारी, महाराष्ट्र चेंबरचे सल्लागार दिलीप साळवेकर, सहायक सचिव अविनाश पाठक, प्रकाश अमृतकर, हरीश जैन, योगेश येवले, कीर्तीकुमार कोठारी, प्रशांत निकम, मयूर लाड, कांत पाटील, दीपक दोशी, चंद्रशेखर भावसार, महेश जवळ, अमोल मराठे, सौ संगीता पाटील, सौ. भारती मिस्त्री, सौ. प्रियदर्शनी रजाळे, सौ. सुनीता पाटील, सौ. रेखा ठाकूर, सौ. विजया जैन, सौ. आरती रेवा, सौ. पूजा पाटील, सौ. सोनाली पाटील, सौ. फरीदा करू, सौ. भारती गाळा, सौ. नूतन पाटील, सौ. रत्ना भदाणे, सौ. शीतल सावंत आदींसह व्यापारी उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते व्यापारी उद्योजक मोठया संख्येने उपस्थित होते.

# सोलापूर विमानतळ लवकर सुरू होण्यासाठी 'महाराष्ट्र चेंबर' पुढाकार घेईल - ललित गांधी

## ललित गांधी यांची सोलापूर विमानतळास भेट व पाहणी

## विमानतळास शेठ वालचंद हिराचंद यांचे नाव देण्याची मागणी



सोलापूर : सोलापूर ला खऱ्या अर्थाने उद्योगनगरी म्हणून विकसित करावयाचे असेल तर विमानतळ व नियमित विमानसेवा सुरू होणे गरजेचे असल्याने सोलापूर मधील होटगी रोड येथील विमानतळ लवकरात लवकर सुरू होण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स विशेष पुढाकार घेईल असे प्रतिपादन अध्यक्ष ललित गांधी यांनी केले.

ललित गांधी यांनी सोलापूर मधील कार्यकारीणी सदस्य केतन शहा व संजीव पाटील यांच्या समवेत विमानतळाच्या सद्यस्थिती पाहणी करण्यासाठी विमानतळास भेट दिली त्यावेळी ते बोलत होते.

सोलापूर विमानतळाचे काम पुर्णत्वाकडे असुन ऑगस्ट २०२४ पर्यंत येथुन विमानसेवा सुरू करण्यासाठी आपण प्रयत्न करू असेही त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी विमानतळ संचालक चांपला यांचेशी चर्चा केली. भारतीय विमान बनविणारे दृष्टे उद्योजक शेठ वालचंद हिराचंद यांचे सोलापूर हे मुळ गाव असल्याने या विमानतळास शेठ वालचंद हिराचंद विमानतळ असे नाव देण्याची मागणीही चेंबरतर्फे केल्याची माहीती ललित गांधी यांनी दिली.

# धुळे येथे व्यापारी उद्योजक परिषद संपन्न







**धुळे येथे व्यापारी उद्योजक परिषदेप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे ट्रस्टी महेंद्र (कैलास) अगरवाल यांचा सत्कार करताना पदाधिकारी सोबत अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष संजय सोनवणे, उपाध्यक्षा सौ. संगीता पाटिल, नितिन बंग, कैलास अग्रवाल, धुळे शहरातील नूतन गव्हर्निंग कौन्सिल मेंबर अरुण केले, विष्णुकान्त फाफट, राम रोहिरा**

महाराष्ट्र आज ही परकीय गुंतवणुकीत देशात अव्वलस्थानी आहे इतकेच नाही तर आज ही परदेशी गुंतवणुकदारांची प्रथम पसंती महाराष्ट्रच आहे, महाराष्ट्र चेंबरचा २९ देशासोबत सामंजस्य करार झाला आहे इतकेच नाही तर देशातर्फे विविध देशात प्रतिनिधि मंडळ ही चेंबरने नेले आहे. राज्यातील व्यापार उद्योगाला जागतिक स्तरावर बाजारपेठ मिळवून देण्यासाठी देण्यासाठी व राज्याच्या आर्थिक विकासात महाराष्ट्र चेंबरची भूमिका महत्वाची आहे. महाराष्ट्र चेंबरच्या प्रचार प्रसारासाठी, चेंबरचे कार्य ३६ जिल्ह्यात पोहचविण्यासाठी आणि चेंबरच्या माध्यमातून उत्तर महाराष्ट्रातील उद्योगव्यापाराच्या विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येईल. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या माध्यम ातून नवे उद्योग, नवकल्पना आणि व्यापाराच्या क्षेत्रात उत्कृष्टता साधण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे पुढे यावे असे आवाहन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरचे नवनिर्वाचित अध्यक्ष ललित गांधी यांनी केले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर च्या द्विवार्षिक निवडणुका नुकत्याच संपन्न झाल्या. यात नवनिर्वाचित नवीन पदाधिकारींचा सन्मान सोहळा शुक्रवार ५ जुलै २०२४ रोजी रात्री ८ वाजता गोल्डन लीफ रिसोर्ट ला संपन्न झाला.

याप्रसंगी चेंबरचे विविध पदाधिकारी उपस्थित होते. नूतन अध्यक्ष ललित गांधी, नवनिर्वाचित वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, नवनियुक्त ट्रस्टी कैलास अग्रवाल, उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष संजय सोनवणे, उपाध्यक्षा सौ. संगीता पाटिल, नितिन बंग, धुळे शहरातील नूतन गव्हर्निंग कौन्सिल मेंबर अरुण केले, विष्णुकान्त फाफट, राम रोहिरा मंचवर उपस्थित होते. नूतन पदाधिकारी यांचा सन्मान शहरातील व्यापार, उद्योग क्षेत्रातील सुनील रुणवाल, राजेश भतवाल, अजय पसारी, ज्ञानेश्वर भामरे, अजय अग्रवाल, सुभाष अग्रवाल, अल्केश अग्रवाल, अरुण नावरकर, महेश बाफ़ना, हर्ष रेलन, किशोर भांगडिया रवि बेलपाठक, मनोज डिसा या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला . चेंबर च्या ९८ वर्षाच्या इतिहासात प्रथमच चेंबर च्या ट्रस्ट बोर्ड वर ट्रस्टी म्हणून शहरातील ओम ग्रुपचे कैलास अग्रवाल यांची सहा वर्षासाठी नियुक्ति झाली. धुळे शहरासाठी ही अभिमानाची बाब आहे. कैलास अग्रवाल यांच्या सफ़ल व्यवसायी, कुशल संघटक,दानशूरता, नम्र स्वभाव, प्रचंड जनसंपर्क यामुळेच त्यांना हा सन्मान मिळाला. चेंबर च्या पदाधिकाऱ्यांनी हा निर्णय घेतला त्याबद्दल आभार व्यक्त करण्यासाठी चेंबर च्या सर्व पदाधिकारींना आमंत्रित करण्यात आले होते. चेंबर च्या नासिक शाखेचे अध्यक्ष अंजू सिंघल, प्रफुल सचेती, मंदार वाईकर, स्वप्नील जैन जळगांव येथील गव्हर्निंग कौन्सिल मेंबर अरविंद दहाड, किरण पाटील, अश्विनकुमार यांचीही उपस्थिति कार्यक्रमास होती, आपल्या भाषणाप्रसंगी ललित गांधी यांनी धुळे व्यापारी महासंघाचे अध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे माजी उपाध्यक्ष नितिन बंग यांची एका विशेष कामिटी च्या अध्यक्षपदी निवड जाहीर केली त्याबद्दल नितिन बंग यांचा सत्कार करण्यात आला. तसेच गांधी यांनी पवन अग्रवाल यांची गव्हर्निंग कौन्सिल मेंबरचे स्विकृत सदस्यपदी निवड जाहीर केली. त्यांचाही सत्कार करण्यात आला. या प्रसंगी चेंबर चे नवीन पैट्रन मेम्बर जितेन्द्र चौवटिया, किशोर पोद्दार यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संदीप अग्रवाल, सचिन अग्रवाल, योगेश अग्रवाल, राजेश मोर, राजेंद्र कावडीया,धुळे व्यापारी महासंघ, ऑइल सीड्स क्रशर असो, लघुउद्योग भारती, डामा असो यांनी सहकार्य केले . कार्यक्रमाचे सूत्र संचलन राजेश गिंदोंडिया व चेतन बरडिया यांनी केले तर आभार प्रदर्शन पवन अग्रवाल यांनी केले.कार्यक्रमास व्यापार, उद्योग व व्यावसायिक क्षेत्रातील जेष्ठ, वरिष्ठ मान्यवर मंडळी उपस्थित होती .

# कौशल्य विकास व उद्योजकता वाढीसाठी 'महाराष्ट्र चेंबर' चे कार्य अभिनंदनीय - केंद्रीय मंत्री नाम. जयंत चौधरी





**केंद्रीय कौशल्य विकास व उद्योजक मंत्री नाम. जयंत चौधरी यांना पुष्पगुच्छ देवुन स्वागत करताना महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी सोबत जे.के.जैन, व्ही. नामदेव. दुसऱ्या छायाचित्रात मंत्री महोदयांशी चर्चा करताना अध्यक्ष ललित गांधी**

नवी दिल्ली : महाराष्ट्रातील युवकांच्या कौशल्य वाढीसाठी व उद्योजकता वाढीसाठी 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' तर्फे सुरू असलेले कार्य अभिनंदनीय असुन भारत सरकारचे कौशल्य विकास मंत्रालय भविष्यात 'महाराष्ट्र चेंबर' बरोबर संयुक्त उपक्रम राबवेल अशी ग्वाही केंद्रीय कौशल्य विकास व उद्योजक मंत्री नाम. जयंत चौधरी यांनी केले.

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' चे अध्यक्ष ललित गांधी यांनी नुकतीच नवी दिल्ली येथे कौशल्य विकास मंत्रालयात केंद्रीय मंत्री नाम. जयंत चौधरी व केंद्रीय सचिव अतुल कुमार तिवारी यांची भेट घेऊन 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' च्या उपक्रमाची माहीती दिली त्याप्रसंगी ते बोलत होते.

सदर बैठकीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी केंद्रीय मंत्रालय व 'हाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' यांनी संयुक्तपणे राष्ट्रीय कौशल्य विकास व उद्योजकता परिषद महाराष्ट्रात आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी झालेल्या चर्चेत मंत्रालययाचे प्रधान सचिव अतुलकुमार तिवारी (IAS) यांनी व अन्य अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला. चेंबरचे दिल्ली प्रतिनिधी जे.के. जैन, सोच चे व्ही. नामदेव हे यावेळी उपस्थित होते.

# छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्री उद्योग उत्थान सौर योजना कार्यक्रम संपन्न





दि. २९ मे २०२४ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्री उद्योग उत्थान सौर योजनाची माहिती देण्यासाठी चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रिज ॲण्ड ॲग्रिकल्चरच्या सभागृहात कार्यक्रम संपन्न झाला.

याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे मराठवाडा विभागाचे उपाध्यक्ष तनसुख झांबड यांनी उपस्थित उद्योजकांशी संवाद साधून योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. योजनेची माहिती यशराज गोऱ्हे व धनंजय काळे यांनी दिली. तसेच उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. या सभेला छत्रपती संभाजीनगरमधील उद्योजक बहुसंख्येने उपस्थित होते.

# निर्यातदारांना लागणारे 'सर्टिफिकेट ऑफ ओरिजीन' ची सुविधा महाराष्ट्र चेंबर च्या बारामती कार्यालयामध्ये सुरू करू - ललित गांधी




**महाराष्ट्र चेंबर्सच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रम 'मराठी पाऊल पडते पुढे' याचे आयोजन करण्यात आले होते. तसेच महाराष्ट्र चेंबर्सचे नुतन अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगांवे, उपाध्यक्ष दिलीप गुप्ता तसेच गव्हर्निंग कौन्सिल सदस्य म्हणून निवड झालेले शरद सुर्यवंशी, चंद्रकांत ठक्कर, डॉ. विजयकुमार मालापुरे, जगदीश पंजाबी, महेश ओसवाल यांचाही याप्रसंगी बारामती विभागाच्या वतीने सत्कार करण्यात आला.**

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज ॲण्ड ॲग्रीकल्चर या संस्थेची शतक महोत्सवाकडे वाटचाल सुरू असून, नुकतीच बाराम तीमध्ये विभागीय कार्यालय सुरू केले असून, त्याला १०० दिवस पूर्ण झाल्याबद्दल महाराष्ट्र चेंबर्सच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रम 'मराठी पाऊल पडते पुढे' याचे आयोजन करण्यात आले होते. तसेच महाराष्ट्र चेंबर्सचे नुतन अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगांवे, उपाध्यक्ष दिलीप गुप्ता तसेच गव्हर्निंग कौन्सिल सदस्य म्हणून निवड झालेले शरद सुर्यवंशी, चंद्रकांत ठक्कर, डॉ. विजयकुमार मालापुरे, जगदीश पंजाबी, महेश ओसवाल यांचाही याप्रसंगी बारामती विभागाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

बारामती विभागाचे चेअरमन शरद सुर्यवंशी यांनी निर्यातदारांना लागणारे 'सर्टिफिकेट ऑफ ओरिजीन' हे प्रमाणपत्र बारामतीच्या विभागीय कार्यालयामध्ये देण्यात यावे यासाठी सातत्याने चेंबर्सकडे पाठपुरावा केला होता याची दखल घेवून ललित गांधी यांनी सदरील सुविधा १ जुलै २०२४ पासून बारामती विभागीय कार्यालयातून सुरू करीत असल्याचे जाहीर केले. सदरील प्रमाणपत्र हे चेंबरचे विभागीय कार्यालय 'हॉटेल सुर्या' पहिला मजला, भिगवण रोड, बारामती येथून देण्यात येईल. तरी बारामती विभागातील निर्यातदार उद्योजकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा. या कार्यक्रमासाठी भारत फोर्ज, रिअल डेअरी, सोहन ग्रुप, हॉटेल सुर्या यांनी विशेष सहकार्य केले.

प्रस्ताविक बारामती विभागाचे चेअरमन श्री. शरद सुर्यवंशी यांनी केले. उपस्थितांचे स्वागत बारामती विभागाचे व्हा. चेअरमन शिवाजीराव निंबाळकर यांनी केले. आभार - बारामती विभागाचे व्हा. चेअरमन सुशिलकुमार सोमाणी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी भारत फोर्जचे प्लान्ट हेड संजय आगरवाल, सदाशिव पाटील, ॲड. पी. टी. गांधी, मनोज तुपे, सुरेश पकराळे, विलास आडके, साईनाथ चौधर, भारत जाधव, विजय पवार इ. मान्यवर उपस्थित होते.







# सोलापूर आर्यनंदी एज्युकेशन अँड रिसर्च फाउंडेशनच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ

## महाराष्ट्र चेंबरचे नवनिर्वाचित अध्यक्ष ललित गांधी यांचा सत्कार







**गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभाप्रसंगी मार्गदर्शन करताना महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष माजी अध्यक्ष अरविंद दोशी, चेंबरचे नवनिर्वाचित अध्यक्ष ललित गांधी व्यासपीठावर उपस्थित डॉ. शिल्पा फडकुले, वैभव आहेरकर, बाहुवली दुरुगकर, संजय गांधी, डॉ. राजेश फडकुले, प्रेमचंद मेने.**

**सोलापूर :** आर्यनंदी परिवार व आर्यनंदी एज्युकेशन अँड रिसर्च फाउंडेशन, सोलापूर वतीने रविवार दि. १६ जुन २०२४ हिराचंद नेमचंद वाचनालय, किर्लोस्कर सभागृह किल्ला बगीचा सम ोर, सोलापूर येथे १० वी, १२ वी उत्तीर्ण (किमान गुण ७५%) आणि डिप्लोमा, पदवीधर, पदव्युत्तर व NEET परिक्षेत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थी यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या स्थानी अध्यक्ष प्रसिद्ध उद्योजक मा. अरविंदरावजी दोशी (वालचंद उद्योग समूह) हे होते.

सत्कार समारंभास प्रमुख अतिथी म्हणून नवनिर्वाचित अध्यक्ष महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, मा. श्री ललीतजी गांधी, मा. संजय गांधी उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते दिप प्रज्वलन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ राजेश फडकुले यांनी केले. अतिथींच्या मनोगतानंतर मान्यवरांच्या शुभहस्ते सर्व गुणवंत विद्यार्थी यांचा सत्कार करण्यात आला. ललीत गांधी यांनी यथोचित मार्गदर्शन केले. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राजेश र. फडकुले, डॉ. सौ शिल्पा फडकुले, केतन शहा, संजीव पाटील, संचालक, सल्लागार सदस्य, कर्मचारी आदी उपस्थित होते. यावेळी 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' च्या 'अध्यक्षपदी' फ ेरनिवड झाल्याबद्दल ललित गांधी यांचा महाराष्ट्र चेंबर चे माजी अध्यक्ष व वालचंद उद्योग समुहातील ज्येष्ठ सदस्य अरविंद दोशी यांच्या हस्ते सत्कार करणेत आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मयुरी दुरूगकर व कु. दिपाली दुरुगकर तर आभार प्रदर्शन संस्थेचे तज्ज्ञ संचालक प्रा. प्रेमचंद मेने यांनी केले.



# महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरची द्वैवार्षिक निवडणूक उत्साहात संपन्न

## विविध मतदान केंद्रावर सभासदांनी रांगा लावून केले मतदान




**महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी नाशिक विभागाच्या मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला, दुसऱ्या छायाचित्रात सभासदांचा उत्साही प्रतिसाद बघायला मिळाला.**

मुंबई : महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरची द्वैवार्षिक निवडणूक उत्साहात संपन्न झाली. सभासदांनी उस्त्फुर्त सहभाग घेत नाशिक, मुंबई, कोल्हापूर, पुणे , सांगली आदिसह राज्यातील विविध मतदान केंद्रावर रांगा लावून मतदान केले. या द्वैवार्षिक निवडणूकीत विद्यमान अध्यक्ष ललित गांधी यांची बिनविरोध निवड झाली. वरिष्ठ उपाध्यक्षपदी रविंद्र माणगावे (सांगली), मुंबई विभागाच्या उपाध्यक्षपदी करूणाकर शेट्टी, मराठवाडा विभागाच्या उपाध्यक्षपदी प्रफुल्ल मालानी विजयी झाले. कार्यकारिणी सदस्यांच्या ९० जागांपैकी ८५ जागा बिनविरोध निवड होऊन ठाणे विभागातील ५ जागांसाठी ८ उमेदवारांपैकी ५ उमेदवार विजयी झाले. वरिष्ठ उपाध्यक्षपदी रविंद्र माणगावे (सांगली) यांनी १६०५ मते मिळवून विरोधी उमेदवार अनिल गचके (४८२ मते) यांना ११२३ मतांनी पराभूत केले. मुंबई विभागाच्या उपाध्यक्षपदी करूणाकर शेट्टी यांनी १३५ मते मिळवून विरोधी उमेदवार व मुंबई जिल्हा बँकेच्या संचालिका कविता देशमुख (५५ मते) यांचा ८० मतांनी पराभव केला. मराठवाडा विभागाच्या उपाध्यक्षपदी प्रफुल्ल मालानी यांनी १८६ मते मिळवून विरोधी उमेदवार अर्जुन गायके (३६ मते) यांचा पराभव केला. बिनविरोध विजयी झालेले अन्य उपाध्यक्ष पुढील प्रमाणे पश्चिम महाराष्ट्र विभागातुन रमाकांत मालु व दिलीप गुप्ता, उत्तर महाराष्ट्र विभागातुन संजय सोनवणे व सौ. संगीता पाटील, मुंबई २ विभागातून शंकर शिंदे, कोकण विभागातुन श्रीकृष्ण परब विजयी झाले. निर्विवाद विजयानंतर ललित गांधी यांनी राज्यभरातील सभासदांना धन्यवाद दिले व गेल्या दोन वर्षात केलेल्या कार्याची पोचपावती दिल्याबद्दल हा विजय राज्यभरातील महाराष्ट्र चेंबर च्या सभासदांना अर्पण करत असल्याचे सांगुन. विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले.

संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत निवडणूक अधिकारी व सेक्रेटरी जनरल सुरेश घोरपडे, सहाय्यक निवडणूक अधिकारी व सेक्रेटरी जनरल प्रभारी जे. के. पाटील यांनी काम पाहीले. निवडणूक समितिवर रमेश रांका व उत्तम शहा यांनी तर तक्रार निवारण समितिवर माजी अध्यक्ष अरविंद दोशी, अरूण ललवाणी व धनंजय दुग्गे यांनी काम पाहीले.




**औरंगाबाद व सांगली मतदान केंद्रावर सभासंदानी मतदानासाठी एकत्रीत मतदानाचा हक्क बजावला.**

# मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरमची ६ वी सभा उत्साहात संपन्न



मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरमची ६ वी सभा मंगळवार दि. ९ जुलै २०२४ रोजी सकाळी ७.३० वाजता फोरमचे चेअरमन दत्ता भालेराव यांच्या अध्यक्षतेखाली हॉटेल ग्रॅण्ड रिओ येथे संपन्न झाली.

सुरुवातीला फोरमचे चेअरमन दत्ता भालेराव यांनी सदस्यांचे स्वागत केले. फोरमचे वैशिष्ट्ये सांगून फोरमच्या माध्यमातून सदस्यांना मिळालेल्या व्यवसाय संधीची माहिती दिली. सर्व सदस्यांनी फोरमची सदस्य संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन केले. सदस्य राजाराम सांगळे यांनी प्रास्ताविकात फोरमची सविस्तर माहिती दिली. मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरम राज्यातील ३६ जिल्ह्यात स्थापन करण्यात येत असून फोरमच्या सदस्यांना राज्यात व्यवसाय वृद्धीची संधी मिळणार असल्याचे सांगितले.

मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरमच्या सर्व सदस्यांनी आपआपल्या व्यवसाय आणि उत्पादनांची माहिती दिली. व्यवसाय वृद्धीच्या दृष्टीने माहितीची देवाणघेवाण केली. सभेस १० नवीन सदस्य उपस्थित होते. सभेस दत्ता भालेराव, राजाराम सांगळे, रविंद्र झोपे, राजेश नेमाडे, किरण पवार, किरण जाट, विजय गायकवाड, अमित पवार, योगेश देवरे, राजेंद्र कोठावदे, मतीन शेख, कांत पडोळ, अशोक घुले, बाबासाहेब क्षीरसागर, तुषार जी. वास्तव, प्रशांत पांडे, डॉ. संदिप बोरसे, आशुतोष गायकवाड, चेतन पवार, रूपेश कणसे, चंद्रकांत सोनार, मंगेश भणगे, सौ. मीरा पगारे, सचिन दिवे, शैलेश बागुल, सीए आनंद मुथा, विरेंद्र मेहेत्रे, रवी जैन, एस. पी. साळुंके, देवेंद्र राणे, सहायक सचिव सचिन जाधव उपस्थित होते.

# मासिआ बिझनेस फोरमच्या ४ थ्या बैठकीत ४४ लाखांचा व्यवसाय



दि. ११ जुन २०२४ रोजी मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरमची ४ थी सभा अध्यक्ष श्री. ललित गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. याप्रसंगी फोरमचे चेअरमन श्री. दत्ता भालेराव यांनी अध्यक्ष श्री. ललित गांधी यांचे स्वागत केले. उत्तर महाराष्ट्र विभागाचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष श्री. संजय सोनवणे व नाशिक शाखा चेअरमन श्री.अंजु सिंघल यांचा अध्यक्ष श्री. ललित गांधी यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

फोरमचे चेअरमन श्री. दत्ता भालेराव यांनी मासिआ बिझनेस फोरमची माहिती दिली. फोरमच्या झालेल्या सभेची माहिती देऊन गेल्या १५ दिवसात फोरमच्या सभासदांचा आपआपसात ४४ लाख रुपयांचा व्यवसाय झाल्याची माहिती दिली.

अध्यक्ष श्री. ललित गांधी यांनी बिझनेस फोरमच्या महाराष्ट्र चेंबरच्या सदस्यांचा व्यापार, व्यवसाय राज्यात व्हावा यादृष्टीने फोरम सुरू करण्यात आला असून सदस्यांना त्याचा फायदा होत आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात टप्प्याटप्प्याने फोरमची सुरवात करण्यात येणार असल्याचे सांगितले.

याप्रसंगी मासिआ बिझनेस फोरमचे ४८ सदस्य बैठकीला उपस्थित होते.

# व्यापाऱ्यांचे राष्ट्रीय नेतृत्व प्रवीण खंडेलवाल 'खासदार'पदी

## महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांचा नवी दिल्ली येथे जाहीर सत्कार





**ललित गांधी यांचा सत्कार करताना खासदार प्रविण खंडेलवाल, सोबत धैर्यशील पाटील व अन्य मान्यवर दुसऱ्या छायाचित्रात प्रवीण खंडेलवाल यांची खासदारपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी सोबत बी.सी.भरतीया, जे.के.जैन**

नवी दिल्ली : देशातील व्यापाऱ्यांचे राष्ट्रीय नेतृत्व व कॉन्फ ेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स चे राष्ट्रीय महामंत्री प्रवीण खंडेलवाल यांनी चांदणी चौक, दिल्ली मतदारसंघातुन जोरदार बहुमताने विजय मिळवून लोकसभेत प्रवेश केला.

खऱ्या अर्थाने व्यापारी प्रतिनिधि म्हणून कार्य करणाऱ्या नेतृत्वाची 'खासदार' पदी निवड ही देशभरातील व्यापाऱ्यांच्यात उत्साह निम र्ाण करणारी घटना आहे. त्यांच्या खासदारदी निवड झाल्याबद्दल देशभरातील व्यापाऱ्यांच्यावतीने प्रवीण खंडेलवाल यांचा तालकटोरा स्टेडिअम येथे नागरी सत्कार आयोजित केला होता. ७००० व्यापाऱ्यांच्या उपस्थितीत संपन्न या समारंभासाठी विशेष अतिथी म्हणून उपस्थित असलेने ललित गांधी यांचा 'महाराष्ट्र चेंबर' च्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल खासदार प्रवीवण खंडेलवाल यांच्या हस्ते 'जाहीर सत्कार' करण्यात आला. याप्रसंगी धैर्यशील पाटील यांच्यासह देशभरातील व्यापारी नेते उपस्थित होते. समारंभानंतर ललित गांधी यांनी प्रवीण खंडेलवाल यांच्या निवासस्थानी भेट देऊन खासदारपदी निवडीबद्दल त्यांचा सत्कार केला.

# मुख्यमंत्री उद्योग उत्थान सौर योजना उद्योजकांसाठी लाभदायी - तेजस शिंदे




मुख्यमंत्री उद्योग उत्थान सौर योजना राज्यामध्ये राबविली जात आहे. सुक्ष्म आणि लघु उद्योगांच्या दृष्टीने या योजनेचे महत्व विशेष आहे. त्यादृष्टीने सन २०२३ मध्ये महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर आणि महाप्रित कंपनी यांचा सामंजस्य करार झाला आहे. त्यानुसार संपूर्ण महाराष्ट्रातील औद्योगिक विभागातून या संदर्भामध्ये जागृती करणे, योजनेची माहिती देऊन इच्छुक उद्योजकांना त्यातून सोलर व्यवस्था उभी करून देणे अशा बाबींचा समावेश आहे. तसेच या अनुशंगाने याविषयासंदर्भात ठिकठिकाणी संवाद सभा आणि चर्चासत्रे घेण्याबाबतही ठरले आहे.

यासंबंधीच्या कार्यक्रमामध्ये महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष संजय सोनवणे यांनी उपस्थित राहून याबाबत सर्वांना अवगत केले. महाप्रितच्या वतीने महाव्यवस्थापक तेजस शिंदे यांनी या योजनेमुळे सुक्ष्म व लघु उद्योजकांना कसा लाभ होऊ शकतो आणि वीज खर्चामध्ये त्यातून कशी बचत लाभते यावर मार्गदर्शन केले. आयमाचे अध्यक्ष ललित बुब यांनी अशा प्रयत्नांमुळे उद्योजकांना दिलासा मिळू शकेल व त्यासाठी त्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.

या कार्यक्रमास नाशिक विभागातील उद्योजक, कारखानदार आणि स्टार्टअपमधील नवउद्योजक बहुसंख्येने उपस्थित होते.

# पश्चिम आणि मध्य आफ्रिकेतील व्यवसायाच्या संधींचा फायदा घ्यावा - नागेश राणे




फिक्की व महाराष्ट्र चेंबरच्या पाठिंब्याने ARISE स्पेशल इकॉनॉमिक झोन (SEZ) च्या माध्यमातून पश्चिम आणि मध्य आफ्रिकेतील व्यवसायाच्या संधी या विषयावर संवादात्मक सत्र शुक्रवार दि. ७ जून २०२४ रोजी सकाळी ११ ते १ हॉटेल बीएलव्हिडी, सातपूर येथे संपन्न झाले. भारतीय कंपन्यांसाठी पश्चिम आणि मध्य आफ्रिकेतील RISE SEZ द्वारे गुंतवणूक आणि व्यवसाय करण्याची क्षमता आणि फायदे याविषयी माहिती देऊन चर्चा करण्यात आली.

याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे शाखा चेअरमन संजय सोनवणे, फिक्कीचे संचालक दिपक मुखी, फिक्कीचे एनइसी मेंबर नंदेश यंदे, अराईसचे मार्केटिंग हेड नागेश राणे, ग्रीन बॅक अडवायझरी सर्विसेस प्रा. लि. चे संचालक सुब्रमनियम शर्मा व्यासपीठावर उपस्थित होते.

स्वागत फिक्कीचे एनइसी मेंबर नंदेश यंदे यांनी केले. फिक्कीचे संचालक दिपक मुखी यांनी प्रास्ताविक करताना फिक्कीच्या कार्याची माहिती देऊन देशातील उद्योगांना जागतिक स्तरावर बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आजच्या कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे सांगितले. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

महाराष्ट्र चेंबरचे शाखा चेअरमन संजय सोनवणे यांनी राज्यातील व्यापार, उद्योगाला देश व जागतिकस्तरावर व्यापार उद्योगांच्या संधीची माहिती देणे, व्यापार उद्योगांचा विकास व्हावा यासाठी महाराष्ट्र चेंबर स्वातंत्र्यपूर्व काळापासून कार्यरत आहे. शताब्दी वर्षाकडे वाटचाल सुरु असून चेंबरने देश व जागतिक स्तरावर राज्यातील व्यापार उद्योगांचा विस्तार होण्यासाठी महत्वपूर्ण कार्य केले आहे. पश्चिम व मध्य आफ्रिकेत व्यापार उद्योगांच्या मोठ्या प्रमाणात संधी असून अराईज च्या माध्यमातून सविस्तर मार्गदर्शन व सर्व प्रकारची मदत मिळनार असून सर्वांनी त्याचा फायदा घ्यावा असे आवाहन केले.

अराईसचे मार्केटिंग हेड नागेश राणे यांनी RISE पश्चिम आणि मध्य आफ्रिकेत सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP) मध्ये विशेष आर्थिक क्षेत्रे विकसित करत आहे आणि गॅबॉन, टोगो, बेनिन, आयव्हरी कोस्ट, डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ द काँगो, रिपब्लिक ऑफ द काँगो, चाड, रवांडा, सिएरा यासह १० वाढत्या देशांमध्ये कार्यरत असल्याचे सांगितले. आफ्रिकेतील अंतर्गत अग्रगण्य गुंतवणूकदारांपैकी एक म्हणून भारत उदयास आला आहे. भारत सरकारने भारतीय उद्योजकांना आफ्रिकन बाजारपेठा शोधण्यासाठी सतत प्रोत्साहन दिले आहे.

पश्चिम आणि मध्य आफ्रिकेत वस्त्र, कृषी प्रक्रिया (काजू, सोया, मका, कोको, शिया, अननस आणि टोमॅटो), इमारती लाकूड, खते आणि रसायने, पुनर्वापर उद्योग, फार्मा, प्लास्टिक , ऑटोमोबाईल, पॅकेजिंग, इलेक्ट्रॉनिक्स, फोन आणि संगणक असेंब्ली, बांधकाम साहित्य, इलेक्ट्रिक वाहन या क्षेत्रांमध्ये भारतीय कंपन्यांसाठी व्यवसाय आणि गुंतवणुकीच्या संधी याविषयी चित्रफितीद्वारे माहिती दिली. तसेच भारतीय कंपन्यांसाठी आफ्रिकन बाजारपेठेत इंडस्ट्रियल शेड मॅन्युफॅक्चरिंग (फॅक्टरी आणि स्टोरेज), सिरॅमिक्स, इंडस्ट्रियल वेस्ट रीसायकलिंग, टू-व्हीलर टायर मॅन्युफॅक्चरिंग आणि पॅकेजिंग (लिक्विड आणि सॉलिड) साठी अराईज संयुक्त उपक्रमाची संधी देत असल्याची माहिती दिली.


उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे नागेश राणे व सुब्रम नियम शर्मा यांनी दिली.

ग्रीन बॅक अडवायझरी सर्विसेस प्रा. लि. चे संचालक सुब्रमनियम शर्मा यांनी गुंतवणूक करणाऱ्या उद्योगांना फायनान्स कशाप्रकारे उपलब्ध करून दिला जातो याची माहिती दिली.

याप्रसंगी श्रीकांत पडोळ, सुहास सराफ, श्रीकांत पाटील, तुषार चौधरी, आशुतोष गायकवाड, स्वाती महाजन, पूजा अहिरे, योगेश लोढा, फिक्कीचे डेप्युटी डायरेक्टर प्रदिप अहिरे, महाराष्ट्र चेंबरचे सहायक सचिव अविनाश पाठक आदिंसह उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्येष्ठ उद्योजक व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे माजी अध्यक्ष सुभाष दांडेकर यांचे दु:खद निधन

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली



आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत ख्यातीप्राप्त कॅम्लीन उद्योग समूहाचे प्रमुख, महाराष्ट्रातील ज्येष्ठ उद्योजक व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीजचे माजी अध्यक्ष श्री.सुभाष दांडेकर यांचे १५ जुलै रोजी दुखद निधन झाले असल्याची माहिती महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.

महाराष्ट्राच्या उद्योग क्षेत्रामध्ये त्यांचा मोलाचा वाटा होता. कॅमलिन उद्योग समूहाचा पसारा आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत नेण्यामध्ये त्यांची भूमिका महत्त्वाची होती असे सांगून ललित गांधी यांनी पुढे सांगितले की १९९० ते ९२ या काळात त्यांनी राज्याच्या व्यापार, उद्योग क्षेत्राची शिखर संस्था असलेल्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष पद भूषवले. भारताने खुली अर्थव्यवस्था स्वीकारली त्या काळात निर्माण झालेल्या नवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या वतीने राज्यभर व्यापारी-उद्योजकांच्या मध्ये प्रबोधनाचे काम केले या काळात त्यांनी अध्यक्ष पदाची धुरा समर्थपणे सांभाळली होती.

राज्यातील उद्योजकांचे स्थानिक स्तरावरचे प्रश्नक तेथेच निकाली निघावेत यासाठी उद्योग मित्र समिती जिल्हा स्तरापर्यंत स्थापन्याची संकल्पना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या वतीने श्री सुभाष दांडेकर यांनी तत्कालीन उद्योग मंत्री विलासराव देशमुख यांच्याकडे मांडली. उद्योग मंत्र्यांनी त्यास मान्यता दिली व राज्यभर या समितीच्या सभा नियमित सुरू झाल्या. त्याचा फार मोठा फायदा राज्यातील उद्योग जगताला आजही होत असल्याचे ललित गांधी यांनी आवर्जून नमूद केले.

नाशिक येथे महाराष्ट्र चेंबरच्या उत्तर महाराष्ट्र विभागाचे स्व-मालकीचे कार्यालय सुद्धा त्यांच्याच कारकिर्दीमध्ये सुरू करण्यात आले.

हजारो उद्योजकांना प्रेरणा देणारे हजारो लोकांना रोजगार देणारे ज्येष्ठ उद्योजक आपल्यातून निघून गेले आहेत ही बाब मनाला वेदना देणारी आहे. दांडेकर कुटुंबीयांच्या दुःखामध्ये राज्यातील संपूर्ण व्यापार उद्योग क्षेत्र सहभागी आहे. अशा शब्दात महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री चे विद्यमान अध्यक्ष ललित गांधी यांनी सुभाष दांडेकर यांना श्रद्धांजली अर्पण केली.

## गं. भा. वेणूताई नावरकर



महाराष्ट्र चेंबरचे माजी कार्यकारीणी सदस्य श्री. अरूण नावरकर यांच्या मातोश्री गं. भा. वेणूताई नावरकर यांचे बुधवार दि. २२ मे २०२४ रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाने नावरकर कुंटुंबियांस झालेल्या दु:खामध्ये महाराष्ट्र चेंबर आणि चेंबरचे सर्व सदस्य सहभागी आहेत. परमेश्वर गं. भा. वेणूताई नावरकर यांच्या आत्म्यास सद्‌गती देवो. महाराष्ट्र चेंबरतर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.

## विको लॅबोरेटरीजचे अध्यक्ष श्री. यशवंतराव पेंढारकर



विको लॅबोरेटरीज या कंपनीचे अध्यक्ष श्री. यशवंतराव पेंढारकर हे महाराष्ट्रातील एक अग्रणी उद्योजक म्हणून परिचित आहेत. दि. २४ मे २०२४ रोजी त्यांचे निधन झाले. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात आणि परदेशातही आयुर्वे दीय आरोग्यविषयक उत्पादनांनी भारताचा एक विशेष ठसा उमटवला आहे तो विको कंपनीच्या कार्यकर्तृत्वाने. सर्वांसाठी ही अभिमानाची बाब असून नवउद्योजकांना प्रेरक अशी आहे. आपल्या महाराष्ट्र चेंबरचे गेली अनेक वर्षे ते सदस्य आहेत. संशोधनात्मक आणि विकासात्मक अशा प्रकारच्या बाबींवर श्री. यशवंतराव यांनी मोठे काम केले आहे. श्री. यशवंतरावाच्या निधनाने एक अनुभवी मार्गदर्शक उद्योजकाला आपण मुकलो आहोत. महाराष्ट्र चेंबरच्यावतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहोत.

# जीएसटी आयटीसी मागण्यासाठी रिटर्न व्यतिरिक्त काही वेगळा पर्याय आहे का?




**विनायक आगाशे**
**सहाय्यक विक्रीकर आयुक्त (निवृत्त)**

या लेखाच्या शिर्षकामधूनच जीएसटी करदात्याची व्यथा इथे मांडली आहे. आज १ जुलै २०२४ बरोबर याच दिवशी आपल्या देशाच्या करक्षेत्रात वस्तू आणि सेवा कर कायदा अस्तित्वात आला. त्याला आता ७ वर्ष पूर्ण झाली असून ८ व्या वर्षात या कायद्याने पदार्पण केले आहे. सुरुवातीच्या काही काळात करदात्यांना बऱ्याच अडचणींना तोंड द्यावे लागले. हे जरी खरे असले तरी त्यावर मात करण्यात शासनाला नक्कीच यश आले आहे. असे असले तरी अजूनही एका जिव्हाळ्याच्या विषयावर करदात्यांना आजच्या घडीला देखील तोंड द्यावे लागत आहे. ही सल माझ्यासारख्या करक्षेत्रात वावरणाऱ्या व्यक्तीला टोचत आहे. त्याचे कारण म्हणजे मी प्रथम पासून व्हॅट आणि जीएसटी कायद्याचा समर्थक आहे. माझ्या व्याख्यानातून हा कायदा व्यापार आणि उद्योग धंद्याच्या वाढीला कसा पोषक आहे या मुद्यावर माझा भर असायचा शासनाने महसूल वाढीच्या उद्देशाने हा कायदा अंमलात आणला. शासनाचे हे उद्दीष्ट अपेक्षेपेक्षाही अधिक प्रमाणात साध्या झाले आहे. उद्योगक्षेत्रालाही ही करप्रणाली लाभदायक ठरली आहे. असं असलं तरी या कायद्यातील करदात्यांची एक खरी अडचण सोडवली जात नाहीये. या कायद्याखाली करदात्यांना रिटर्न दाखल करताना कराचा भरणा न करता ते दाखल करता येत नाही. अश्याप्रकारची अट या आधीच्या व्हॅट कायद्यात नव्हती. आर्थिक संकटात सापडलेल्या करदात्याकडून रिटर्न दाखल केले जात नाही. रिटर्न वेळेत न दाखल झाल्यामुळे कलम १६ (४) खालील अटीमुळे त्याला मिळणाऱ्या आयटीसीला बाधा पोहोचते. देशातील अनेक उच्च न्यायालयांनी या समस्येची गंभीर दखल या आधीच घेतली आहे. वानगी देखल मुंबई उच्च न्यायालयाचा Rohit Enterprises vs. Commissioner State GST Bhavan या प्रकरणात आर्थिक अडचणीच्या संदर्भात दिलेला निर्णय किंवा मद्रास उच्च न्यायालयचा Kavin HP Gas Vitarak Vs The Commissioner of Commercial Taxes या प्रकरणातील निर्णय.

थोडक्यात म्हणजे रिटर्न विहित मुदतीत दाखल न होण्यास अनेक कारणे असू शकतात पण या कारणाचा विचार न करता एक तर्फी निर्णय होत आहेत त्यामुळे करदात्याकडून न्यायालयाचे दरवाजे ठोटावले जात आहेत. अश्या परिस्थितीत ही समस्या सोडवण्यासाठी शासनाकडे असलेल्या अधिकारातून विलंब माफ करून सोडवणूक करता यावी किंवा आयटीसी मागण्यासाठी एका वेगळ्या नमुन्यात माहिती मागण्यात यावी. आणि त्यासाठीच कलम १६ (४) खालील अट लागू करावी, असे सुचवावेसे वाटते. विविध न्यायालयाच्या निर्णयातून हेच सूचित होत आहे. जाता जाता इथे हे पण नमूद करणे आवश्यक आहे की 2B च्या तरतुदीमुळे आताच्या घडीला या समस्येची तीव्रता कमी झालेली आहे. आणि येणाऱ्या काळात ह्या रेंगाळलेल्या जाचक तरतुदींमध्ये देखील सुधारणा होईल अशी अपेक्षा करता येईल.

## हार्दिक अभिनंदन







महाराष्ट्र चेंबरचे सदस्य **श्री. प्रमोद शहा** यांची ऑल इंडिया मॅनेजमेंट असोसिएशन (नवी दिल्ली) शी संलग्न बॉम्बे मॅनेजमेंट असोसिएशन (बीएमए) च्या अध्यक्षपदी निवड झाली. **महाराष्ट्र चेंबर तर्फे हार्दिक अभिनंदन !**

# नुतन पदाधिकारी परिचय





# ललित गांधी, अध्यक्ष

## 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर'च्या अध्यक्ष पदी सलग तिसऱ्यांदा निवड

कोल्हापूर येथील प्रथितयश व्यावसायिक व सामाजिक कार्यातील अग्रणी नेतृत्व श्री. ललित गांधी यांची महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्षपदी तिसऱ्यांदा बिनविरोध निवड झाली आहे. ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्यकारणी सदस्य, तज्ञ समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, वरिष्ठ उपाध्यक्ष म्हणून कार्य केलेले असून महाराष्ट्र चेंबरच्या कार्यकारीणी समितीवर २००० पासून कार्य करत आहेत.

व्यापारी-उद्योजकांच्या न्याय मागण्यांसाठी, संरक्षणासाठी आक्रमकपणे लढणारे लढवय्ये नेते म्हणून देशभर ख्यातीप्राप्त श्री. गांधी गेले ४२ वर्षे व्यवसायात असून गेली ३८ वर्षे सामाजिक कार्यात सक्रियपणे कार्यरत आहेत.

ललित गांधी हे देशभरातील ८ कोटी व्यापाऱ्यांची शिखर संस्था कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (CAIT) चे 'राष्ट्रीय संगठन मंत्री' म्हणुन जबाबदारी पाहीली असुन, वेस्टर्न महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲग्रो व एज्युकेशन (वेसमॅक)चे अध्यक्ष व कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स (केसीसीआय) या संस्थेचे माजी अध्यक्ष आहेत. फिक्की, असोचेम , इंडियन मर्चंटस् चेंबर चे कार्यकारीणी सदस्य आहेत. श्री. गांधी हे २८ वर्षांपासून राजारामपुरी मर्चंटस् असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून पदभार सांभाळत आहेत. सामाजिक क्षेत्रात जितो, ग्लोबल मारवाडी चॅरिटेबल फाऊंडेशन (मिशन कॅन्सर कंट्रोल-इंडिया) या संस्थांचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. मॅफकॉसचे माजी अध्यक्ष, महावीर एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष, भारत सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालयाच्या सीपीसीएसईए समितीतर्फे शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर), पीडी ॲग्रि. युनिर्व्हसिटी (अकोला), शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (कोल्हापूर व मिरज), कृष्णा मेडिकल कॉलेज (कराड), गर्व्हमेंट फार्मसी कॉलेज (कराड), एस. पी. गोगटे कॉलेज (रत्नागिरी), केएलई मेडिकल कॉलेज (बेळगाव), जेजे मगदूम कॉलेज (जयसिंगपूर) या संस्थांच्या समित्यांवर भारत सरकारचे प्रतिनिधीत्व करत आहेत.

त्यांनी जपान, थायलंड, फ्रान्स, इंग्लंड, मॉरिशस, अमेरिका, बांग्लादेश, श्रीलंका, नेपाळ या देशांना भारताच्यावतीने व्यापार प्रतिनिधी मंडळांद्वारे भेटी दिल्या आहेत. त्यांना सहकार भूषण राष्ट्रीय पुरस्कार, नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार, राजीव गांधी एक्सलन्सी ॲवॉर्ड, भगवान महावीर अहिंसा पुरस्कार २०१४, जैन समाजरत्न पुरस्कार २०१५, जैन रत्न पुरस्कार २०२४ आदि पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

२०१५ साली तत्कालीन राष्ट्रपती माननीय श्री. प्रणव मुखर्जी यांच्यासमवेत 'स्वीडन' दौऱ्यात तसेच २०१८ साली माननीय राष्ट्रपती श्री. रामनाथ कोविंद यांच्यासमवेत 'ग्रीस' दौऱ्यावर जाण्याचीही त्यांना संधी मिळाली. तसेच २०१८ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या समवेत आफ्रीका दौऱ्यावर जाण्याची संधी देखील मिळाली. स्वतःच्या बांधकाम, रिअल इस्टेट व कृषि पुरक उद्योगां व्यतिरीक्त सहकार, बँकींग इ. विविध क्षेत्रातील प्रचंड अनुभव व अभ्यासामुळे विविध विषयांवर मार्गदर्शन व अभ्यासपूर्ण मांडणीसाठी त्यांची विशेष ख्याती आहे.

महाराष्ट्र चेंबरच्या ४० व्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळल्यानंतर ललित गांधी यांनी त्यांच्या झंझावती व आक्रमक कार्यशैलीद्वारे 'महाराष्ट्र चेंबर' चा गौरव द्विगुणीत केला. उद्योगांचे प्रलंबित अनुदान मंजुरी, प्लास्टीक बंदीतुन काही घटक वगळणे, अनुदान योजना मुदतवाढ, अंतरराष्ट्रीय स्तरावर नवीन करार, राज्याच्या विविध विभागात कार्यालयांचा प्रारंभ अशा अनेक उपक्रमांमधून महाराष्ट्र चेंबरची घोडदौड चालु ठेवली आहे.

## रविंद्र माणगावे, वरिष्ठ उपाध्यक्ष



सांगली येथील प्रसिध्द उद्योजक रविंद्र माणगावे यांची चेंबरच्या वरिष्ठ उपाध्यक्ष पदी निवडून आले आहेत. याआधी त्यांनी पश्चिम महाराष्ट्र विभागाच्या उपाध्यक्षपदी दोन वेळा बिनविरोध निवडून आले होते. चेंबरच्या माध्यमातुन त्यांनी अनेक लघु उद्योग, महिलांसाठी लघु व्यवसाय यांना पुढे येण्यासाठी मार्गदर्शन व व्यवसाय सुरू करण्यास मदत केली. रविंद्र माणगावे यांचे शिक्षण बी. कॉम. एमबीएपर्यंत झाले आहे. आयात, निर्यात, रिअल इस्टेट या व्यवसायात ते कार्यरत आहेत. त्यांनी चेंबरचे कार्यकारीणी सदस्य तसेच चेंबरच्या इंटरनॅशनल रिलेशन समितीचे चेअरमन म्हणून काम केलेले आहे. याशिवाय ते एसआरएम इलाईट एंटरप्राईजेसचे भागीदार आहेत. सामाजिक क्षेत्रातही त्यांचे मोठे योगदान आहे. ते दक्षिण भारत जैन सभा सांगलीचे माजी उपाध्यक्ष आहेत. एसआरएम फाऊंडेशनचे अध्यक्ष आहेत. कर्मवीर आरोग्य अभियानाचे संस्थापक आहेत. सांगली जिल्ह्यातील सावळवाडी या गावाचे सर्वात तरूण सरपंच म्हणून ते निवडून आले होते. त्यांच्या कार्यकाळात सावळवाडी गावास शासनाच्या विविध योजनांचे पारितोषिके मिळाली आहेत. एक आदर्श गाव म्हणून लौकिक प्राप्त झाला आहे. राज्याच्या व्यापारी व औद्योगिक विकासासाठी महाराष्ट्र चेंबरच्या माध्यमातून कार्य करत आहेत.

## करूणाकर शेट्टी, उपाध्यक्ष-मुंबई १



उच्चविद्याभूषित श्री शेट्टी हे या वर्षीही महाराष्ट चेम्बरच्या मुंबई– १ विभागासाठी उपाध्यक्ष म्हणून तिसऱ्यांदा निवडून आले आहेत. हे शिप एअर फॉरवर्डर्स प्रा.लि चेयरमन आणि व्यवस्थापकीय संचालक असून लॉजिस्टिक व क्रीडा उद्योगातील प्रख्यात असे व्यक्तिमत्त्व आहे. त्याना लॉजिस्टिक्स क्षेत्रात ४० वर्षांहून अधिक काळ काम केल्याचा मोठा अनुभव आहे. लॉजिस्टिक उद्योग आणि क्रीडा उपक्रमांच्या प्रगतीसाठी ते सदैव सक्रियपणे कार्यरत आहेत. करूणाकर शेट्टी हे माजी अध्यक्ष बृहन्मुंबई कस्टम ब्रोकर्स असोसिएशन, संचालक यूएस इंडिया इम्पोर्टर्स कौन्सिल, उपाध्यक्ष पोइसर जिमखाना, मुंबई, अध्यक्ष मुंबई उपनगर जिल्हा मल्लखांब संघटना, व्यवस्थापकीय समिती सदस्य कर्नाटक स्पोर्टिंग असोसिएशन अश्या विविध पदावर कार्यरत आहेत.

## शंकर शिंदे, उपाध्यक्ष-मुंबई २



उच्यविद्याभूषित श्री. शिंदे हे ग्लोबल एक्सप्रेस मल्टिलॉजिस्टीक प्रा. ली. या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आहेत. या वर्षी महाराष्ट्र चेम्बरच्या उपाध्यक्ष मुंबई विभाग २ पदी त्यांची बिनविरोध निवड झाली आहे. लॉजिस्टिक उद्योगाचा त्यांना ३५ वर्षाचा अनुभव आहे. अनेक संस्थशी पदाधिकारी म्हणून त्यांनी काम केले आहे. ज्यामध्ये चेअरमन इंटरनॅशनल फेडेरेशन ऑफ कस्टम्स ब्रोकर्स असोसिएशनच (IFCBA) व्हा. चेअरमन इंटरनॅशनल कॉ ऑर्डीनटिंग कौन्सिल ऑन ट्रान्स – युरिसिएशन ट्रान्सपोर्टेशन (CCTT), या उल्लेखनीय संस्था आहेत. श्री. शिंदे यांना मुंबई कस्टम्स, वर्ड ट्रेड सेंटर, यांच्याकडून पुरस्कार प्राप्त झाले आहेत.



## संजय सोनवणे, उपाध्यक्ष-उत्तर महाराष्ट्र-१

उच्चविद्याभूषित श्री. सोनवणे हे इंडिल्युब पेट्रो स्पेशॅलिटीज प्रा. लि. चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक असून चेम्बरचे उत्तर महाराष्ट्र विभाग शाखा अध्यक्ष होते. यावर्षी उपाध्यक्ष उत्तर महाराष्ट्र १ चे उपाध्यक्ष म्हणून बिनविरोध निवडून आले आहेत. श्री. सोनवणे यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत त्यापैकी राष्ट्रीय उद्योग भूषण पुरस्कार, २०१६ पासून सतत सात वर्षांसाठी सर्वोत्कृष्ट MSME पुरस्कार, २०१६ आणि २०१९ साठी सर्वोत्कृष्ट ब्रँड पुरस्कार, २०१७ साठी नाविन्यपूर्ण नेतृत्व पुरस्कार, २०२१ चा वर्ल्ड अचिव्हर्स अवॉर्ड, असोसिएशन ऑफ इंडियन जर्नलिस्ट्स चा अवॉर्ड, मॅन्युफॅक्चरिंग लीडरशिप ॲवॉर्ड इ. उल्लेखनीय आहेत. अनेक सामाजिक संस्थावर पदाधिकारी म्हणून श्री. सोनवणे यांची नियुक्ती झाली आहे. त्यापैकी संस्थापक अध्यक्ष इंडो रोड सेफ्टी फौंडेशन, संस्थापक अध्यक्ष ऑल इंडिया लुब डीलर असोसिएशन, उपाध्यक्ष, द कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स, अध्यक्ष, फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ऑटोमोबाईल डीलर्स अससोसिएशन, नवी दिल्ली, माजी उपाध्यक्ष, निमा, नाशिक मोटर मर्चेंट्स असोसिएशन इ.



## संगिता पाटील, उपाध्यक्ष-उत्तर महाराष्ट्र-२

व्यावसायिक शिक्षण, उद्योजकता आणि सामाजिक क्षेत्रात सक्रिय असलेल्या सौ. पाटील, जळगाव यांची उत्तर महाराष्ट्र २ उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. महाराष्ट्र चेंबरच्या कार्यकारिणी सदस्य व महिला उद्योजकता समितीच्या अध्यक्षपदी त्यांनी कार्य केले आहे. वस्त्रोद्योग मंत्रालय, भारत सरकारच्या हस्तकला विकास आयुक्त कार्यालयाच्या श्रेणी १ अंतर्गत नामांकित तारका फाउंडेशन' 'च्या संस्थापक अध्यक्षा आहेत. तसेच ८ कोटी व्यापारांची शिखर संस्था कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (CAIT) च्या राष्ट्रीय संयोजिका म्हणून सक्रिय कार्यरत आहेत. शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता समितीच्या सदस्य म्हणूनही त्या कार्यरत आहेत, सामाजिक क्षेत्रात १४ वर्षांपासून रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३०३० मध्ये सक्रिय आहेत

NIFD ग्लोबल जळगाव-संगीता अकादमी या उद्योगाशी संलग्न अभ्यासक्रम असलेल्या संस्थेच्या संचालिका आहेत. आतापर्यंत संकुलाला ११ राष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत आणि १७ विद्यार्थ्यांनी न्यूयॉर्क फॅशन वीकमध्ये भारतीय कला आणि संस्कृतीचे प्रतिनिधित्व केले आहे. हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन नोकरी आणि व्यवसाय करत आहेत. सौ. संगीता पाटील त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. तत्कालीन केंद्रीय मंत्री श्रीमती स्मृतीजी इराणी यांच्या हस्ते राष्ट्रीय विशिष्ट महिला रत्नसन्मान, महिला व बाल विकास आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांच्या हस्ते महाराष्ट्र कन्या रत्न पुरस्कार, रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३०३० मध्ये PRID LATE EDUL C. EDULJEE "ट्रॉफी फॉर द 'बेस्ट क्लब प्रेसिडेंट' पुरस्कार तसेच महाराष्ट्र उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते आणि ND वर्ल्डतर्फे उत्कृष्ट शैक्षणिक कार्याबद्दल सन्मानित, माजी पर्यटन मंत्री सुबोधकांत सहाय आणि फेमिना मिस इंडिया वर्ल्ड पार्वती ओमनाकुट्टन यांच्या हस्ते 'बेस्ट फॅशन शो' साठी राष्ट्रीय पुरस्कार, तसेच महाराष्ट्र शासन तर्फे बेस्ट व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र पुरस्कार मिळाला आहे. उद्योजक आणि व्यापारी यांचे विविध प्रश्नक सातत्याने मांडून सोडवून घेत उद्योग विकासासाठी कार्यरत आहेत.



## श्रीकृष्ण परब, उपाध्यक्ष-कोकण

पदवीधर श्री परब हे या वर्षी ही महाराष्ट चेम्बर च्या कोंकण विभागसाठी उपाध्यक्ष म्हणून पुनः बिनविरोध निवडून आले आहेत. हे लॉजिस्टिक क्षेत्रातील नामवंत उद्योजक आहेत, श्रीस्वामी समर्थ एअरक्रेट प्रा. चे सर्वेसर्वा आहेत. श्री परब हे आंतरराष्ट्रीय मालवाहतूक, कृषी निर्यात, मुख्यतः मिश्र भाज्या आणि फळभाज्या तज्ञ आहेत ज्यामुळे ते लॉजिस्टिक आणि कृषी कंपन्यांमध्ये त्यांचे मोठे योगदान आहे श्री परब हे ग्रामीण विकास, कृषी विकास, युवा विकास आणि क्रीडा प्रशिक्षण तसेच उद्योग आणि उद्योजकता विकास या क्षेत्रात सक्रियपणे कार्य करत आहे. श्री. परब हे चेम्बरच्या गव्हर्निंग कौन्सिलचे १५ वर्ष सदस्य, सिंधुदुर्ग सहकारी बँक, सिंधुदुर्ग शेतकरी उत्पादक कं. लि., संचालक, सिंधुदुर्ग शेतकरी उत्पादक कं. लि., कोकणभूमी कृषी पर्यतन संस्था लि. इ. संस्था चे संचालक आहेत.

## रमाकांत मालु, उपाध्यक्ष-पश्चिम महाराष्ट्र- १



उच्चविद्याभूषित श्री रमाकांत मालू हे या वर्षी महाराष्ट चेम्बर च्या पश्चिम महाराष्ट्र विभाग -१ विभागसाठी उपाध्यक्ष म्हणून बिनविरोध निवडून आले 'समृद्धि इंडस्ट्रीस लि. प्रख्यात कंपनीचे संचालक आहे. औद्योगिक प्लॅस्टिक, क्लिनिंग वेअर आणि कृषी उत्पादनांच्या निर्मितीमध्ये भारतातील 'समृद्धि' हा नामवंत १ नंबर चा ब्रांड आहे. श्री रमाकांत मालू यांनी रताला ग्रामीण भागात प्रसिद्ध असणारे अत्यंत कमी वजनाचा अभंग, गंजमुक्त आणि टिकाऊ प्लास्टिक 'घमेला' शोधून काढला. ज्याला भारत सरकारचे पेटंट प्राप्त आहे. समृद्धीने २५० उत्पादने भारतीय बाजारपेठेत ७ श्रेणींमध्ये सादर केली आहेत जसे की घरगुती, ॲग्रो होम केअर मेट्स आणि कार्पेट्स, क्लिनिंग वेअर आणि प्लास्टिक प्लाय भारतात सर्वत्र यशस्वीपणे चालवत आहेत. समृद्धीचे ६ ठिकाणी अद्ययावत असे ६ कारखाने असून ७०० पेक्षा अधिक कर्मचारी वर्ग येथे काम करतो आहे. श्री मालू यांना 'बिझनेस आऊटलूक मॅगझिनचा, एलिफंट इन एम्बिशन्स, चारचौघी मासिकचा पुरस्कारांनी 'प्लॅस्टिकचा राजा', 'लोकमत आयकॉन ॲवॉर्ड' इ. अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत। महाराष्ट्र शासनातर्फे आयोजित 'सुसंवाद' या चर्चसत्र कार्यक्रमात त्याचा सहभाग असतो. पूर, भूकंप या सारख्या नैसर्गिक आपत्ती आल्यावर मालू साहेब नेहमीच मदत व मदतीसाठी आघाडीच्या भूमिकेत असतात.



## दिलीप गुप्ता, उपाध्यक्ष-पश्चिम महाराष्ट्र- २

उच्चविद्याभूषित दिलीप गुप्ता डॉल्फिन ग्रुप पुणे चे संचालक आहेत. या वर्षी महाराष्ट्र चेम्बरच्या उपाध्यक्ष - पश्चिम महाराष्ट्र विभाग २ पदी त्यांची बिनविरोध निवड झाली आहे. विविध सामाजिक संस्थासोबत त्यानी पदाधिकारी म्हणून काम केले आहे. व्यापार, उद्योग क्षेत्राच्या विविध संस्थांशी ते निगडीत आहेत.

## प्रफुल मालाणी, उपाध्यक्ष-मराठवाडा



पदवीधर असणारे श्री. मालानी, हे लक्ष्मी इलेक्ट्रिकल अँड इंजिनिर्स, छ. संभाजीनगर चे मालक असून या वर्षी महाराष्ट्र चेंबर च्या मराठवाडा विभागातून उपाध्यक्ष म्हणून निवडून आले आहेत. श्री. मालानी, महाराष्ट्र चेंबरचे १४ वर्ष कार्यकारणी सदस्य म्हणून होते. तसेच श्री. संभाजीनगर मधील विविध संस्थांमध्ये ते पदाधिकारी म्हणून कार्यरत होते. श्री. माहेश्वरी मंडळचे कोशाध्यक्ष, शिवसेना नगरसेवक सुनाणानगर, संचालक, पीपल्स बँक, चेअरमन, पीपल्स को-ऑप. बँक, सदस्य- द.म. रेल्वे बोर्ड, नांदेड, सदस्य, औरंगाबाद जिल्हा भाववाढ नियंत्रण समिती, महाराष्ट्र शाशन नियुक्त, २०२८-२२ या कालावधी मध्ये श्री. मालानी मराठवाडा चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष होते. संभाजीनगर येथील श्री संस्थान गणपती ट्रस्ट, श्री बालाजी मंदिर ट्रस्ट, श्री माहेश्वरी सेवा ट्रस्ट आणि आ. कृ. वाघमारे शाळा, या संस्थांमध्ये विश्वस्त म्हणून श्री मालानी, कार्यरत आहेत.

# Newly Elected Governing Council Members

## Mumbai


Mr. Hitendra Mota


Mr. Vinyak Patkar


Mr. Omprakash Agarwal


Mr. Pankaj Vora


Mr. Prafull Chhajed


Mr. Vikas Deodhar


Ms. Rekha Pagdhare


Ms. Pradnya Ponkshe


Ms. Dhanashri Hardas


Mr. Ghanshyam Sandu


Mr. Pramod Shah


Mr. Keshav Korgaonkar


Mr. Prakash Chopra


Mr. Sunil Zode


Mr. Mandar Vaidya


Mr. Viraj Chodankar


Mr. Vidya Shah


Mr. Sahadev Shivalkar

## Navi Mumbai


Mr. Govind A. Palav


Mr. Rajesh K. Jadhav

# Newly Elected Governing Council Members

## Thane


Mr. Vikas Achha


Mr. Manoj Kr. Chavan


Mr. Krishnat Dhembre


Mr. Pramod Sangode


Ms. Ranjana Erankar

## Palghar


Ms. Deepa Raut


Mr. Nilesh Gharat

## Ahmednagar


Mr. Prakash V. Kalantri


Mr. Nilesh K. Chavan

## Dhule


Mr. Anil S. Rohra


Mr. Arun Kale


Mr. Vishnukant Phafat

## Jalgaon


Mr. Mahendra Raisoni


Mr. Kiran Bacchav


Mr. Nitin Ingale


Mr. Arvind Dahad

# Newly Elected Governing Council Members

## Nashik


Mr. Ranjeet Anand


Mr. Bharat Yeola


Mr. Sunil Kotwal


Mr. Ravi Jain


Mr. Ratan Padwal


Mr. Sachin Jadhav


Mr. BalasahebGunjal


Mr. Sachin Shah


Mr. SureshChawla


Ms. Dipali Chandak


Mr. Swapnil Jain


Mr. Satyajit Mahajan


Mr. Sandeep Somwanshi


Mr. Vedanshu Patil


Ms. Sonal Dagade

## Sangli


Mr. Prakash Shah


Mr. Sarjerao Nalavade


Mr. Ramesh Arawade


Mr. Sanjay Aranake


Mr. Chetan Chavan

# Newly Elected Governing Council Members

## Kolhapur



Mr. Bharat
P. Jadhav



Mr. Rajaram
T. Patil



Mr. Dhairyashil
H. Patil



Mr. Nitin
Dhoot



Mr. Nandkumar
R. Shah



Mr. Jitendra
V. Shah



Ashvini
V. Danigond

## Pune



Mr. Anand
Mittal



Mr. Sandip
Bhandari



Mr. Chandrakant
Thakkar



Mr. Vijaykumar
Malapure

## Solapur



Mr. Sanjiv Patil



Mr. Ketan Shah

# Newly Elected Governing Council Members

## Chhatrapati Sambhajinagar



Mr. Gopal Patel



Mr. Sanjay Knkariya



Mr. Vijay Jaiswal



Mr. Arjun Gaike



Mr. Satish Lonikar

## Jalna



Mr. Dinesh Rathi



Mr. Bhavesh Patel

## Akola



Mr. Nitin Khandelwal

## Sindhudurg



Mr. Milind Prabhu



Mr. Rajan Naik



Mr. Manoj Walawalkar



Mr. Shivaji Ghogale



Mr. Nandan Vengurlekar

## Ratnagiri



Mr. Prashant Patwardhan



Mr. Santosh G. Tawade

## Raigad



Mr. Vinod L. Bafna



Mr. Mayur C. Jain



Mr. Kartik K. Jain

# MACCIA - CABINET - EXPERT COMMITTEES

| Sr. No. | Committee Names | Chairman | Co-Chairman |
|---|---|---|---|
| 1 | Agriculture and Rural Development Committee | Rajaram Sangle | Vikram Khade<br>Mayank Gupta<br>Balasaheb Solankure |
| 2 | Arbitration (ADR) Committee | Rahul Hingmire | Ishan Patkar |
| 3 | Business Forum Committee | Deepak Choudhari | Datta Bhalerao |
| 4 | Centenary Celebrations Planning Committee | Tansukh Jhambad | Arun Lalwani |
| 5 | Civil Aviation Committee | Manish Rawal | Ketan Shah |
| 6 | Cluster Development Committee | Shrikant Patil | Satish Lonikar |
| 7 | Corporate Social Responsibility (CSR) Committee | Ghanshyam Goyal | Prakash Kanugo<br>Swapnil Shah |
| 8 | Digital Economy and E-commerce Committee | Dharmendra Pawar | Viren Bavishi |
| 9 | Education and Skill Development Committee | Sandip Bhandari | Manoj Chavan<br>V. Namdeo |
| 10 | Environment Committee | U. K. Sharma | Vaishali Swaroop |
| 11 | Finance and Banking Committee | Prafull Chajed | Mansi Khanolkar<br>Avinash Kothavade |
| 12 | Food Processing Committee | Manoj Zanwar | Pankaj Vora<br>Prakash Mehata |
| 13 | Forum of Industry Associations (MACCIA-FIA) | Ashish Nahar | Madhusudan Rungta |
| 14 | Forum of Trade Associations (MACCIA FOTA) | Nitin Bang | Jagannath Kale |
| 15 | Furniture, Hardware Sector Committee | Sanjay Lunawat | Nandkumar Shah<br>Amit Barot |
| 16 | Government Co-ordination Committee | Sharad Suryawanshi | Sunil Mutha |
| 17 | Infrastructure and Urban Development Committee | Sunil Pharande | Prasanna Deshpande<br>Girish Chitale |
| 18 | Internal Trade & Consumer Affairs Committee | Dhairyashil Patil | Rajendra Bathiya<br>Ramnik Cheda |
| 19 | International Relations and Trade Committee | Gagan Mohotra | Sandeep Nagori |
| 20 | Legal and Regulatory Affairs Committee | Pramod Shah | Keshav Korgaonkar |
| 21 | MACCIA State Infrastructure Committee | Vijay Vedmutha | Ashwinkumar Pardeshi |
| 22 | Micro, Small and Medium Enterprises (MSME) Committee | Hiteshbhai Mota | Rajendra Kothavade |
| 23 | North Maharashtra Chamber Bhavan Committee | Kantilal Chopda | Mahendra Raisoni |
| 24 | Ports, Logistics and warehousing Committee | C. S. Singh | Omprakash Agarwal<br>Nikhil Goyal |
| 25 | Power Tariff Electricity Committee | Pratap Hogade | Shridhar Vyavhare |
| 26 | PR, Media & communication committee | Sarika Mohotra | Sahil Nyaharkar<br>Abhijit Chande |
| 27 | Real Estate and Construction Committee | Sunil Kotwal | Jayesh Oswal |
| 28 | Renewable Energy Committee | Deepak Kokate | Prashant Joshi |
| 29 | Taxation committee | Viyanak Patkar | Pravina Oswal |
| 30 | Technology and Innovation Committee | Shantaram Surve | Gagan Mohotra<br>Prakash Maladkar |
| 31 | Textile and Apparel Committee | Rahul Awade | Prashant Pokale<br>Pritesh Devkar |
| 32 | Tourism and Hospitality Committee | Datta Bhalerao | Gaurish Dhond |
| 33 | Women Entrepreneurs Committee | Dhanashri Hardas | Shweta Inamdar |
| 34 | Young Entrepreneurs Committee | Ashwinkumar Pardeshi | Sujit Chavan |
| 35 | North Maharashtra Export Promotion Committee | Ravindra Zope | Rajesh Malpure |


# KALLAPPANNA AWADE JAWAHAR SHETKARI SAHAKARI SAKHAR KARKHANA LTD.

Hupari-Yalgud 416 203, Tal.: Hatkanangale, Dist.: Kolhapur (Maharashtra)
Phone (0230) 2450402 to 2450406, Email : kprjsssk@gmail.com,
Web : www.kallappannaawadejawaharsssk.com

**KALLAPPANNA AWADE JAWAHAR**

**Committed to upliftment of farming fraternity, Area Development and Cherishment of co-operative culture**

Dynamic Leadership



Founder Chairman
**Hon'ble Shri Kallappanna Awade**
Ex.M.P.

Visionary Co-operator



Director
**Hon'ble Shri Prakash Awade**
Ex.Minister of Textile, Maharashtra



Chairman, Cane Committee
**Hon'ble Dr. Shri Rahul Awade**

1. Recipient of various National & State level awards
2. Cane crushing capacity of 16000 TCD with generation of 28.5 MW electricity power
3. Cane Development Activities
   a) Free scietific guidance & training to farmers to update new technology for enhancing yield at minimum cultivation cost.
   b) Supply of Jute and Dhaincha seeds & weedicides at 50% subsidy.
   c) Supply of fertilizers, foundation and three-tier cane seed to cane grower agriuculturists at subsidized rates.
   d) Availability of Basal Dose, Second Dose, Liquid spray fertilizers, tonic and vermi-beds on interest free credit.
   e) Supply of Phospo-Compost as well as enriched compost.
   f) Susidy for the trash mulching for multi-ratoon promotion
   g) Promotional subsidy of Rs.8000 per acre for regular drip & Rs.12000 per acre for auto drip. As well as special subsidy of Rs.13000 per acre for auto drip for collective farming above 50 acres.
4. Installation of advanced pollution control system.
5. Medical aid to grower members for any Heart Surgery, Angioplasty, Cancer, Kidney transplantation, Dialasis and Catract surgery.
6. Medi-claim and Group Gratuity scheme for employees.

**Date of Publish : 31st July 2024** **Page No. 1 to 44**
Registered with Regr. of News Paper for India, Delhi under Regd. No. 20803/71, Postal Registration No. KLR-357/2024-2026
Posted on 31st July 2024 at RMS Kolhapur



MACCIA 100
Apex Chamber of the State 1927-2027

## MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE

PRESENTS

### MAHARASHTRA'S LARGEST TRADE FAIR

# MITEX

**MAHARASHTRA INTERNATIONAL TRADE EXPO**

• Mumbai • Pune • Nashik • Chh. Sambhajinagar • Nagpur • Kolhapur

- INTERNATIONAL PAVILION
- GOVERNMENT AND STATE PAVILION
- ELECTRONICS AND DURABLES
- TEXTILES / FASHION & ACCS.
- AUTOMOBILE-FOCUS ON EV
- REAL ESTATE DEVELOPMENT
- BUILDING MATERIALS
- INTERIORS AND HOME DECOR
- BEAUTY, HEALTH AND FITNESS
- PROCESSED FOOD
- FARM AND AGRO
- TRAVEL AND TOURISM
- WRITING INSTRUMENTS
- STATIONERY AND GIFT ARTICLES

**Highlights**

• Delegations from various countries • TIE-UPS with Domestic & International trade bodies
• Seminars and Conferences • Cultural Programmers • Buyer Seller Meets

Supported by

**FOR DETAILS CONTACT :**

**Maharashtra Chamber Of Commerce, Industry & Agriculture (MACCIA)**
Oricon House, 6th Flr., Maharashtra Chamber of Commerce Lane,
Kala Ghoda, Fort, Mumbai – 400 001,
**Tel:** +91 22 6739 5800, **Fax** : +91 22 6739 5800,
**Email:** maccia@maccia.org.in, sec.general@maccia.org.in

MAKE IN INDIA

हे मासिक संपादक, मुद्रक, प्रकाशक ललित गांधी यांनी मालक महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर यांचेकरीता शिवम ऑफसेट,प्लॉट नं. डी-१११, फाइव स्टार एमआयडीसी, कागल-हातकणंगले, कोल्हापूर येथे छापुन बिझनेस हाऊस, १६७७, ई मेन रोड, राजारामपुरी १० वी गल्ली, कोल्हापूर - ४१६००८ येथे प्रसिध्द केले.

If undelivered please return to:
Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture
201, Sarda Sankul, Vakil Wadi, M.G. Road, Nashik-1